मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४० ■ बुधवार, २८ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# भूसंपादनासह सर्व परवानग्यांची कार्यवाही प्रकल्प सुरू होण्यापूर्वी पूर्ण करावी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रो जोडणीस मान्यता

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान मेट्रो मार्गिका ८ च्या ३५ किलोमीटरच्या जोडणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यासोबतच ६६ किलोमीटर लांबीचा नाशिक शहर परिक्रमा मार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यास आणि गडचिरोली जिल्ह्यात खनिज वाहतुकीसाठी नवेगाव मोर ते सुरजागड या चार पदरी सिमेंट काँक्रिट महामार्गाच्या सुधारित आखणीस मान्यता देण्यात आली.



पायाभूत सुविधा प्रकल्पाला आवश्यक असलेले भूसंपादन आणि सर्व प्रकारच्या परवानग्या प्राप्त करून घेण्याची कार्यवाही प्रकल्प सुरू होण्यापूर्वी पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. तसेच कुठलाही पायाभूत सुविधा प्रकल्प भूसंपादनानंतर पुढील तीन वर्षात पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करण्यात यावी. कुठल्याही परिस्थितीत कामे रेंगाळू नये, काम पूर्ण होण्यास विलंब लागल्यास प्रकल्पाच्या खर्चामध्ये वाढ होते. नागपूर ते गोंदिया, भंडारा ते गडचिरोली या समृद्धी महामार्गाच्या विस्तारित कामांना गती द्यावी. प्रकल्प कार्यादेश देतानाच प्रकल्प पुढील तीन वर्षात पूर्ण करण्याची अट करण्यात यावी.

प्रकल्प विहित कालमर्यादेत पूर्ण झाल्यास कंत्राटदाराला प्रोत्साहन मूल्य आणि विहित कालावधीपेक्षा जास्त वेळ लागल्यास दंडाची व्यवस्था असलेली 'ऑटो मोड' वरील यंत्रणा विकसित करावी. गडचिरोली जिल्ह्यातील महामार्गाचे काम करीत असताना रस्त्याच्या बाजूला गॅस वाहिनीसाठी जागेची उपलब्धता असल्याची खात्री करावी. भविष्यात सुरजागडपर्यंत गॅस वाहिनी कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यासाठी आतापासून जागेची तरतूद महामार्गाच्या बाजूला करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिल गायकवाड, महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित आदी उपस्थित होते. बैठकीमध्ये अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मनीषा म्हैसकर आणि सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सादरीकरण केले.

**पायाभूत प्रकल्पांविषयी...**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मेट्रो लाईन ८ जोडणीस मान्यता.

मेट्रो मार्गाची एकूण लांबी ३५ किलोमीटर, भूमिगत मार्ग ९.२५ किलोमीटर, उन्नत मार्ग २४.६३६ किमी, एकूण २० स्थानके, ६ स्थानके भूमिगत, १४ स्थानके उन्नत.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ स्थानक ते घाटकोपर (पूर्व) पर्यंत भूमिगत स्थानके.


घाटकोपर (पश्चिम) स्थानक ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल दोन स्थानकापर्यंत उन्नत स्थानके, दोन स्थानकांतील सरासरी अंतर १.९ किलोमीटर.

७ हेक्टर भूसंपादनाची आवश्यकता, भूसंपादनासाठी ३८८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी एकूण २२ हजार ८६२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर परिक्रमा मार्गाची निर्मिती, मार्गाची एकूण लांबी ६६.१५ किलोमीटर, या प्रकल्पासाठी एकूण ३ हजार ९५४ कोटीच्या खर्चास मान्यता. या प्रकल्पाला विशेष बाब म्हणून ५० टक्के भूसंपादन झाल्यास कार्यादेश देण्याचा निर्णय.


गडचिरोली जिल्ह्यातील खनिज वाहतुकीसाठी नवेगाव मोरे – कोनसरी – मूळचेरा – हेदरी – सुरजागड महामार्गाच्या सुधारित ८५.७६ किलोमीटर लांबीस मान्यता, चार पदरी सिमेंट काँक्रिटकरणाचा महामार्ग.

### प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ध्वजवंदन कार्यक्रमात महावितरणचा 'अन्नदाता ते ऊर्जादाता' चित्ररथ ठरला संचलनाचे आकर्षण



**मुंबई :** प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे आयोजित ध्वजवंदन व संचलनाच्या शासकीय कार्यक्रमात महावितरणचा चित्ररथ आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'अन्नदाता ते ऊर्जादाता' या संकल्पनेवर आधारित महावितरणच्या या चित्ररथाचे कौतुक केले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात सौर ऊर्जेला चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांना शाश्वत आणि मोफत वीज उपलब्ध करून देण्यासाठी अन्नदाता ते ऊर्जादाता ही संकल्पना राबवली आहे.

# तामिळनाडूमध्ये हिंदी भाषेला विरोध; मुख्यमंत्री स्टालिन यांची ठाम भूमिका



**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली :** तमिळनाडूमध्ये हिंदी भाषेला कधीही स्थान दिले गेले नाही आणि भविष्यातही दिले जाणार नाही, अशी ठाम भूमिका राज्याचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनी मांडली आहे.

ही भूमिका केवळ राजकीय नाही, तर तमिळ अस्मितेचा भाग असल्याचेही त्यांनी सूचित केले.

तमिळनाडूच्या भाषिक इतिहासाशी जोडलेला एक महत्त्वाचा दिवस म्हणजे भाषा हुतात्मा दिन.

या दिवशी राज्यात हिंदी भाषेविरोधातील आंदोलनात प्राण अर्पण केलेल्या लोकांची आठवण केली जाते. याच पार्श्वभूमीवर तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुक पक्षाचे अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांनी आपली भूमिका पुन्हा एकदा ठामपणे मांडली.

सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करत भाषेसाठी दिलेल्या बलिदानाला मानवंदना दिली.

**भाषा हुतात्म्यांना श्रद्धांजली**

भाषा हुतात्मा दिनानिमित्त स्टॅलिन यांनी एक भावनिक संदेश शेअर केला.

# महाराष्ट्र दुष्काळमुक्त करणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** महाराष्ट्रातील शेतकरी सुखावला पाहिजे, या दृष्टीने शेतकऱ्यांना सातत्याने भरघोस मदत देण्याचे काम राज्य सरकारने केले आहे. आता पुढच्या टप्प्यांमध्ये दुष्काळमुक्त महाराष्ट्राकडे वाटचाल केली जाईल. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याच्या कानाकोपऱ्यांमध्ये पाणी पोहोचवून शेतकऱ्यांना सुजलाम सुफलाम करण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून केला जात आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शिवाजी पार्क येथे झालेल्या कार्यक्रमात बोलत होते.



राज्याच्या विकासाच्या वाटचालीचा आढावा घेत महाराष्ट्र थांबणार नसल्याचा विश्वास व्यक्त केला. प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देताना त्यांनी २६ जानेवारी १९५० रोजी भारताने राज्यघटना अंगीकारून लोकशाही प्रजासत्ताकाची पायाभरणी केल्याची आठवण करून दिली.जगातील सर्वोत्तम राज्यघटना आपल्याला लाभली असून बाबासाहेब आंबेडकर आणि राज्यघटना निर्मिती समितीला आपण मानवंदना अर्पण करतो," असे ते म्हणाले.

**पान २ वर**

### छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांचा भीषण कट; ११ जवान जखमी



**बिजापूर :** नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात प्रजासत्ताकदिनाच्या पूर्वसंध्येवर पुन्हा एकदा सुरक्षा दलांवर मोठा हल्ला झाला आहे. कर्रेगुट्टा टेकड्यांच्या घनदाट जंगलात नक्षलवाद्यांनी पेरलेल्या अनेक प्रेशर आयईडी स्फोटांच्या मालिकेत ११ सुरक्षा रक्षक जखमी झाले आहेत. रविवारी नक्षलविरोधी मोहिमेदरम्यान ही घटना घडली असून सोमवारी बिजापूर पोलिसांनी याला अधिकृत दुजोरा दिला.

# कर्करोग उपचारांसाठी 'तिष्ठा' हा निवोलुमॅबचा जगातील पहिला बायोसिमिलर सादर

## इम्युनोथेरपी संदर्भ औषधाच्या 1/4 किमतीत उपलब्ध, 5 लाखांहून अधिक रुग्णांना लाभ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेली, नाविन्यपूर्णतेवर आधारित जीवन-विज्ञान क्षेत्रातील कंपनी झायडस लाइफसायन्सेस लिमिटेड (तिच्या उपकंपन्या/संलग्न संस्थांसह; पुढे "झायडस" म्हणून उल्लेख) ने भारतात निवोलुमॅबचा जगातील पहिला बायोसिमिलर तिष्ठा™ या ब्रँड नावाखाली सादर केला आहे. या उपक्रमामुळे प्रगत बायोलॉजिक्स आणि इम्युनो-ऑन्कोलॉजी क्षेत्रातील कंपनीची वाढती क्षमता अधिक बळकट झाली आहे. तिष्ठा™ हे 100 मिलिग्रॅम आणि 40 मिलिग्रॅम अशा दोन मात्रांमध्ये उपलब्ध व त्यामुळे औषधाच्या सुमारे 1/4 कमी किमतीत सादर आहेत. यामुळे उपचार अधिक परवडणारे होतील आणि रुग्णांवरील एकूण उपचारांचा भार कमी होईल. दोन वेगवेगळ्या शक्तींच्या या पोर्टफोलिओमुळे ऑन्कोलॉजिस्टना डोसचे योग्य नियोजन करता येते आणि औषधाचा अपव्यय कमी करता येतो. इम्युनोथेरपीच्या उपचार-अर्थशास्त्रातील एक महत्त्वाचा घटक आहे.

डॉ.शर्विलपी.पटेल,व्यवस्थापकीय संचालक, झायडस लाइफसायन्सेस लिमिटेड म्हणाले,"झायडसमध्ये, प्रत्येक रुग्णाला वेळेवर, परवडणाऱ्या आणि प्रगत कर्करोग उपचारांपर्यंत पोहोचमदत मिळायला हवी असा आमचा ठाम विश्वास आहे. तिष्ठा™ च्या सादरीकरणातून आम्ही रुग्ण-केंद्रित उपचारांच्या माध्यमातून इम्युनो- ऑन्कोलॉजीपर्यंतची उपलब्धता अधिक व्यापक करत आहोत. उपचारांच्या संपूर्ण प्रवासात रुग्णांना सातत्यपूर्ण काळजीपूर्वक सेवा देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. उच्च दर्जाचे बायोसिमिलर इम्युनोथेरपी उपचार रुग्णांना घेता यावेत यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."आधुनिक उपचारांपर्यंतची पोहोच तीन महत्वपूर्ण घटकांवर अवलंबून असते: सातत्य, परवडणारी किंमत आणि व्यापक उपलब्धता. अनेक सायकल्समध्ये उपचार आवश्यक असलेल्या कर्करोग रुग्णांसाठी चेकपॉईंट इनहिबिटर्स**ची विश्वासार्ह उपलब्धता अत्यंत महत्त्वाची असते. कारण उपचारांतील खंडामुळे कुटुंबांवर वैद्यकीय तसेच आर्थिक ताण वाढू शकतो. भारतात विकसित व निर्मित केलेले तिष्ठा™ उपचारांच्या संपूर्ण कालावधीत रुग्णांसाठी दीर्घकालीन विश्वासार्हता सुनिश्चित करते. कर्करोगासोबत जगणाऱ्या रुग्णांसाठी उपचारांचा सातत्यपूर्ण आणि अंदाजे उपलब्ध असलेला प्रवेश अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतात तिष्ठा™ सादर करून, झायडस प्रगत इम्युनो-ऑन्कोलॉजी उपचारांचे प्रमाण अधिक विस्तारत आहे.

# शिवसेनेच्या सोनल घरत यांनी घेतला उमेदवारी अर्ज मागे

## भाजप महायुतीच्या उमेदवार जिज्ञासा मनोहर कोळी यांच्या विजयाचा मार्ग मोकळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या गव्हाण पंचायत समिती गणातून शिवसेनेच्या उमेदवार सोनल मनोज घरत यांनी महायुतीचा धर्म पाळत आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला असून आता भाजप महायुतीच्या उमेदवार जिज्ञासा मनोहर कोळी यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील महायुती सरकारची एकजूट, शिस्त आणि समन्वय कायम ठेवण्याच्या दृष्टीने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे, खासदार श्रीरंग बारणे तसेच आमदार महेंद्र थोरवे यांच्या सूचनेनुसार सोनल घरत यांनी हा निर्णय घेतला. महायुती अधिक बळकट करण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर विकासाला प्राधान्य देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.या निर्णयाची अधिकृत घोषणा करण्यासाठी सोनल घरत यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि



माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी महायुतीच्या विजयासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.याप्रसंगी मनोज घरत, भाजपचे विभागीय अध्यक्ष विजय घरत, उलवे शिवसेना प्रमुख संदीप वायंगणकर, उपशाखाप्रमुख उदय रेणके, उपशहर प्रमुख अंकुश राठोड यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी ठामपणे उभे राहून विजयासाठी पूर्ण ताकद लावण्याचा निर्धार व्यक्त केला. महायुतीच्या माध्यमातून पनवेल तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी एकसंघपणे काम करण्यात येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# योगेश्वर विद्यालय दावचवाडी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक/ विनोद गायकवाड :** दावचवाडी, येथे आज न्यायमूर्ती रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित, योगेश्वर विद्यालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे ध्वजारोहण न्या.रानडे विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त प्रभाकर आण्णा कुयटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी सरपंच अशोक धुमाळ, तलाठी गोरक्षनाथ ठोकळे, सोसायटी चेअरमन संजय कुयटे, पोलीस पाटील शालन शिंदे, स्कूल कमिटी सदस्य शीला आहिरे,गोरखनाथ कुयटे, दिनकर कुयटे, रविंद शिंदे,रावसाहेब जाधव, नितीन लोखंडे, चांगदेव लोखंडे कोतवाल माधुरी आहिरे, आदी. उपस्थित




होते. सकाळी ७:३० वाजता मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या जयघोष करणाऱ्या घोषणा दिल्या.

विद्यालयाच्या एमसीसी पथकाने भारतीय तिरंग्यास मानवंदना दिली.

तसेच स्कूल कमिटी सदस्य पंकजभाऊ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना कॉपी मुक्त अभियान शपथ दिली. तर दावचवाडी ग्रामपंचायत सरपंच अशोक धुमाळ यांनी असाक्षर मुक्त गावाची/ साक्षरता शपथ याबाबत प्रतिज्ञा दिली. यावेळी विद्यार्थ्यांचे कवायत देशभक्ती गीतांच्या तालावर घेण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिना वाघ यांनी केले. आभार संतोष बिऱ्हाडे यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी सुनील मोगल, संतोष बिऱ्हाडे,अंबादास बनसोडे, रमेश वडघुले ,प्रफुल्ल देवरे, निलेश शिंदे, रूपाली मते, मिना वाघ,वैशाली गवळी, शितल देवरे, कैलास भगत, किशोर निफाडे आदींनी प्रयत्न केले.

# शालेय राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धा नाशिकमध्ये उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत नाशिक जिल्हा क्रीडा परिषद यांच्या वतीने तसेच टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र राज्य आणि नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १४, १७ व १९ वर्षांखालील राज्यस्तरीय शालेय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुलात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. या स्पर्धा भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आल्या होत्या.

दोन दिवस चाललेल्या या स्पर्धांमध्ये राज्यातील आठ विभागांतील एकूण ४६ संघांनी सहभाग नोंदवला होता. विविध वयोगटांतील मुला-मुलींनी कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची दाद मिळवली.




स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात नाशिक उपसंचालिका स्नेहल साळुंके यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी नाशिक जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, क्रीडा अधिकारी अजिंक्य दुधारे, भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी, महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, महिला अध्यक्ष धनश्री गिरी, सहसचिव तोरणे सर, नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

**स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे —**

१४ वर्षांखालील मुले : प्रथम – कोल्हापूर, द्वितीय – नागपूर, तृतीय – संभाजीनगर

१४ वर्षांखालील मुली : प्रथम – अमरावती, द्वितीय – पुणे, तृतीय – नाशिक

१७ वर्षांखालील मुले : प्रथम – नाशिक, द्वितीय – कोल्हापूर, तृतीय – नागपूर

१७ वर्षांखालील मुली : प्रथम – कोल्हापूर, द्वितीय – नाशिक, तृतीय – पुणे

१९ वर्षांखालील मुले : प्रथम – कोल्हापूर, द्वितीय – नाशिक, तृतीय – पुणे

१९ वर्षांखालील मुली : प्रथम – अमरावती, द्वितीय – पुणे, तृतीय – नागपूर

या सर्व विजेत्या संघांचे राज्यभरातून अभिनंदन होत आहे.

स्पर्धेचे पंच म्हणून सोमा बिरादार, सत्यम पांडे, धनंजय लोखंडे, मनीष शेवाळे, शुभम जगताप, जगदीश मोरे, धनश्री गिरी, राजेंद्र साळवे, संदीप पाटील, हर्षवर्धन चौधरी व स्वप्निल सुर्वे यांनी जबाबदारी पार पाडली.संपूर्ण स्पर्धा भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडल्या.

# "शिवाजी विद्यालयात देशप्रेमाचा थरार!; १२०० विद्यार्थ्यांच्या संचलनाने सिल्लोड दुमदुमले"

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या संकल्पनेतून सिल्लोड येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय येथे 'संगीत कवायती'चा अभूतपूर्व सोहळा संपन्न झाला. संपूर्ण राज्यात एकाच वेळी राबवण्यात आलेल्या या उपक्रमात सिल्लोडमधील विविध शाळांच्या १२०० विद्यार्थ्यांनी संगीत तालावर सादर केलेल्या कवायतीने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखालील 'दशसूत्री' कार्यक्रमाचा भाग म्हणून या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री




छत्रपती शिवाजी माध्यमिक व प्राथमिक विद्यालय, जिजामाता कन्या विद्यालय आणि एम.पी. इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. केवळ शारीरिक कवायतच नव्हे, तर यावेळी विद्यार्थ्यांनी 'कॉपीमुक्त परीक्षा', 'मतदान जनजागृती', 'साक्षरता' आणि 'तंबाखूमुक्ती'ची सामूहिक शपथ घेऊन नव्या भारताच्या निर्मितीचा संकल्प सोडला.

या भव्य सोहळ्याला उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार संजय देवराये, गट विकास अधिकारी रत्नाकर पगार, पोलीस निरीक्षक शेषराव उदार , मुख्याधिकारी कारभारी दिवेकर आणि गटशिक्षणाधिकारी रमेश ठाकूर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे आणि कौशल्याचे कौतुक केले. शिक्षण विस्तार अधिकारी राजू फुसे, केंद्रप्रमुख बाबुराव गाडेकर, पर्यवेक्षक निशांत म्हस्के आणि मुख्याध्यापक गजानन डमाळे यांनी कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले.

कार्यक्रमाचा प्रारंभ राष्ट्रगीत व राज्यगीताने झाला, तर सांगता राष्ट्रगीत 'वंदे मातरम'ने झाली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संगीता तायडे, संगीता काळे, मधुकर मगर, लक्ष्मण कोलोड, नरेशसिंह राजपूत, रमेश परदेशी, गणेश चव्हाण, अमोल ताटू, अंगद काळे, गजानन दौड, भास्कर सागरे, अरविंद सोनवणे, नम्रता वडमारे, हर्षदा सनांसे, पंकज सावंत, राजू गाढवे, अमोल दांडगे, अमोल पालोदकर, भाऊसाहेब गावंडे, रामेश्वर वाघ, गणेश सुरडकर, शितल गीते, सुवर्णा तारो, मीरा पांगळे आणि श्रीमती जाधव यांच्यासह सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# रायसीना इंग्लिश स्कूल बंगाली पिंपळा केंद्रातून प्रथम

**दैनिक युवक आधार**

**गेवराई प्रतिनिधी/भीमराव गावडे :** मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमाच्या टप्पा क्रमांक तीन मध्ये बंगाली पिंपळा केंद्रातून रायसीना इंग्लिश स्कूल सुशी या शाळेने प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सुशी येथील केसुला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित रायसीना इंग्लिश स्कूल सुशी या ग्रामीण भागातील शाळेमध्ये विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम नेहमीच राबविले जाते. या वेगवेगळ्या उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणा बरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या संस्थे मार्फत केले जाते. व त्याचे मूल्यमापन शिक्षण विभागांतर्गत होते.

शाळेच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास,image0.jpegपरिसरात , वृक्षलागवड, रंगरंगोटी, शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरण, विद्यार्थ्यांचा सहभाग तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीमुळे शाळेला हे



मानांकन प्राप्त झाले. या उपक्रमात शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.पुढील फेरी तालुकास्तरीय होणार आहे .यासाठी शाळेची पूर्ण तयारी आहे .येणाऱ्या काळामध्ये नक्कीच तालुकास्तरीय प्रथम क्रमांक येईल असा विश्वास शाळेचे संचालक तथा मुख्याध्यापक यांनी व्यक्त केला आहे.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक प्रा. विजय राठोड ,श श्री आकाश सर,अनिल सर, अशा मिस ,वैशाली मिस ,नीता मिस ,रेणुका मिस, शुभांगी मिस,स्वप्निल माने, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. ही कामगिरी इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# जनता विद्यालय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक/ विनोद गायकवाड :** धोंडेगाव (नाशिक): मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे,जनता विद्यालय धोंडेगाव येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष कैलास भाऊ बेंडकोळी हे उपस्थित होते. ध्वजारोहण शालेय समिती सदस्य विष्णू मोरे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी उपस्थित सर्व शालेय समिती सदस्य, गावचे सरपंच, पोलीस पाटील, पालक वर्ग तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीत व देशभक्तीपर वातावरणाने संपूर्ण परिसर भारावून गेला.

ध्वजारोहणापूर्वी संविधान वाचन व साक्षरता शपथ शिवनाथ हुजरे यांनी दिली. सर्व विद्यार्थी व उपस्थितांनी शपथेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.यानंतर



विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निर्मला शिंदे यांनी प्रास्ताविक सादर केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थी हा देशाचा भविष्यातील नागरिक असून त्याच्यामध्ये शिस्त, प्रामाणिकपणा, जबाबदारी, राष्ट्रप्रेम व योग्य वर्तनाचे संस्कार बालपणापासून रुजले पाहिजेत. विद्यालय हे केवळ शिक्षण देण्याचे माध्यम नसून सुजाण, जबाबदार व आदर्श नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. असे त्यांनी प्रतिपादन केले.

तसेच विद्यालयातील क्रीडा शिक्षक भाऊसाहेब गाडे यांनी विद्यार्थ्यांकडून देशभक्ती गीतावर संगीतमय कवायत करून घेतली.कार्यक्रमास क्रीडा शिक्षक भाऊसाहेब गाडे, योगेश देवरे, अवधूत हारदे,. पारुल गजे, राहुल पाटील, तसेच शिक्षकेतर सेवक लिपिक श्री हेमंत फडोळ, शिपाई श्री अनिल सावंत मामा व बेंडकोळी मामा उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवनाथ हुजरे यांनी केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग व शिस्तबद्ध आयोजनामुळे कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.यानंतर प्रजासत्ताक दिन सोहळ्याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक गाडे सर यांनी उपस्थित व शालेय समिती व संस्थेचे सभासद व ग्रामस्थांचे यांचे आभार मानले.

# वाशिमचा प्रशासनिक चेहरामोहरा बदलणार!; नव्या शासकीय निवासस्थानाचा दिमाखदार शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** दि. २६ जानेवारी २०२६ –वाशिम जिल्ह्यातील प्रशासन अधिक सक्षम, गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या दिशेने एक मोठा टप्पा पार पडला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उभारण्यात आलेल्या नवनिर्मित शासकीय निवासस्थानाचे लोकार्पण आज पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना ना. भरणे म्हणाले, "अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षित, प्रशस्त आणि सोयीस्कर निवास सुविधा मिळाल्यास प्रशासनाची कार्यक्षमता वाढते. त्याचा थेट लाभ सामान्य नागरिकांना वेळेत, पारदर्शक व गुणवत्तापूर्ण सेवा मिळण्यात होतो."

या नवनिर्मित निवासस्थानामुळे वाशिम जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा अधिक बळकट होणार असून कार्यालयीन कामकाज अधिक गतिमान होणार आहे. राज्य शासन पायाभूत सुविधा विकासाला सर्वोच्च प्राधान्य देत असून, त्याच धोरणाचा भाग म्हणून आधुनिक व दर्जेदार इमारती उभारण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पोलीस अधीक्षक अनुज तारे, भा.प्रो.से. परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर,




तहसीलदार निलेश पळसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, उपविभागीय अभियंता संचित शिंदे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या लोकार्पण सोहळ्यामुळे वाशिम जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्याचा संकल्प पुन्हा एकदा दृढ झाला आहे.

# "वाशिमच्या निर्भीड पत्रकारितेचा वज्रस्तंभ! प्रताप नागरे यांना राज्यस्तरीय 'लोक स्वातंत्र प्रभावी पत्रकारिता गौरव'"

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशीम पत्रकारितेच्या क्षेत्रात सत्य, निर्भीडता आणि लोकहित यांची मशाल खांद्यावर घेऊन सातत्याने लढणारे नाव म्हणजे वाशिम जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पत्रकार मा. प्रताप नागरे. समाजातील वंचित, सामान्य नागरिकांचे प्रश्न, प्रशासनातील त्रुटी आणि अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करत पत्रकारितेला नवी दिशा देणाऱ्या प्रताप नागरे यांना अकोला येथे 'लोक स्वातंत्र प्रभावी पत्रकारिता गौरव' राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा गौरव लोक स्वातंत्र पत्रकार महासंघाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख यांच्या हस्ते गौरवपत्र व सन्मानचिन्ह देऊन प्रदान करण्यात आला.वाशिम जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील जनतेचे प्रश्न सातत्याने मांडत प्रताप नागरे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून प्रशासनाला अनेकदा आरसा दाखवला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ते दैनिक चालू वार्ता या माध्यमातून वाशिम जिल्ह्यातील शेतकरी, कामगार, युवक, महिला व वंचित घटकांचे प्रश्न निर्भीडपणे शासनदरबारी पोहोचवत आहेत. त्यामुळेच ते वाशिम जिल्ह्यातील पत्रकार क्षेत्रात विश्वासार्ह आणि प्रभावी नाव म्हणून ओळखले जातात.

सामाजिक प्रश्नांवर स्पष्ट भूमिका, निर्भय लेखणी आणि लोकहितासाठी झटणारी पत्रकारिता हीच प्रताप नागरे यांची ओळख बनली आहे. त्यांच्या पत्रकारितेमुळे अनेक वेळा प्रशासनाला दखल घ्यावी लागली असून, वाशिम जिल्ह्यातील सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यात त्यांची मोलाची भूमिका राहिली आहे.

पुरस्कार स्वीकारताना प्रताप नागरे यांनी वाशिम जिल्ह्यातील नागरिक, लोक स्वातंत्र पत्रकार महासंघ, तसेच संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संजय




एम. देशमुख यांचे मनापासून आभार मानले."हा सन्मान माझ्यासाठी नसून वाशिम जिल्ह्यातील प्रत्येक निर्भीड पत्रकारासाठी आहे. भविष्यातही लोकहितासाठी आणि सत्यासाठी मी अधिक ताकदीने लेखणी चालवत राहीन," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, वरिष्ठ पत्रकार, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रताप नागरे यांच्या या सन्मानामुळे वाशिम जिल्ह्यातील संपूर्ण पत्रकार क्षेत्रात उत्साहाचे आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे.वाशिम जिल्ह्याच्या निर्भीड पत्रकारितेचा हा विजय म्हणजे सत्याच्या लढ्याची ठळक पावती ठरली आहे!

# जवानांच्या उपस्थितीत 'इरा स्कूल'मध्ये शौर्य-संस्कृतीचा जागर; संविधानातील मूल्यांचा घुमला हुंकार!







**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** सिल्लोड शहरातील शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेल्या इरा इंटरनॅशनल स्कूल मध्ये भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय लष्करातील कार्यरत जवान गणेश उमरे आणि अनंत काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या ध्वजारोहणाने उपस्थितांमध्ये चैतन्य निर्माण केले. सीमेवर देशरक्षण करणाऱ्या या सुपुत्रांच्या उपस्थितीने सोहळ्याची शोभा द्विगुणित झाली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संचालक उत्तमराव गव्हाणे, माणिकराव आहेर, गजानन गव्हाणे, सिद्धेश्वर आहेर आणि योगिता गव्हाणे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या जवानांचा शालेय व्यवस्थापनाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये विशेषतः मराठी भाषेतील अभ्यासपूर्ण भाषणे, देशप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या कविता आणि समूह गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणातून भारतीय संविधान, एकता आणि शिस्तीचे दर्शन घडले. शिक्षण घेतानाच उत्तम संस्कारांची जोपासना करणे हीच विद्यालयाची खरी ओळख असल्याचे प्रतिपादन यावेळी मान्यवरांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी पालक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर वसुलीसाठी निफाड नगरपंचायतीचा ठाम पवित्रा

## मुख्याधिकाऱ्यांचा थेट फील्ड दौरा, थकबाकीदारांना थेट भेटी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** निफाड नगरपंचायतीच्या कर वसुली मोहिमेला अधिक प्रभावी आणि गतीमान करण्याच्या उद्देशाने आज सोमवार, दि. 27 जानेवारी रोजी नगरपंचायतचे मुख्याधिकारी श्री. धिरज भामरे यांनी स्वतः थेट फील्डवर उतरून निफाड शहरातील थकीत कर असलेल्या मालमत्ताधारकांच्या प्रत्यक्ष भेटी घेतल्या. या भेटीदरम्यान त्यांनी नागरिकांशी संवाद साधत थकीत मालमत्ता कर तात्काळ भरण्याचे आवाहन केले.





यावेळी श्री. भामरे यांनी नागरिकांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, नगरपंचायतीचा महसूल हा प्रामुख्याने कर वसुलीवर अवलंबून असतो. नागरिकांनी वेळेत कर भरल्यासच शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा सक्षमपणे पुरवता येतात. रस्त्यांची दुरुस्ती व नवीन रस्त्यांची कामे, नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, ड्रेनेज प्रणाली, कचरा व्यवस्थापन तसेच इतर नागरी सुविधा अधिक दर्जेदार करण्यासाठी कर वसुली अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कर भरणे ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून शहराच्या विकासातील नागरिकांचे महत्त्वाचे योगदान आहे, असे सांगत त्यांनी थकबाकीदारांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन कर भरण्याचे आवाहन केले. कर न भरल्यास भविष्यात कायदेशीर कारवाई करण्यात येऊ शकते, याचीही सूचक माहिती त्यांनी यावेळी दिली.

निफाड नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने सर्व विभागप्रमुखांच्या नेतृत्वाखाली विशेष कर वसुली पथकांची स्थापना करण्यात आली आहे. ही पथके शहरातील विविध प्रभागांमध्ये जाऊन थकबाकीदार मालमत्ताधारकांच्या प्रत्यक्ष भेटी घेत असून, कर भरण्याबाबत समजावून सांगत प्रभावी पाठपुरावा करीत आहेत. या मोहिमेमुळे कर वसुलीत लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

या विशेष कर वसुली मोहिमेत कर निरीक्षक श्री. राहुल लामखडे, प्रशासकीय अधिकारी श्री. शरद बोडके, प्रभाग लिपिक श्री. राजेंद्र भवर, श्री. अनिल कुंदे, श्री. शरद काकुळते, श्री. नरेश धारराव तसेच कर्मचारी श्री. भोसले व श्री. मोगरे हे अधिकारी व कर्मचारी पथकासोबत उपस्थित होते.

दरम्यान, निफाड नगरपंचायत प्रशासनाने सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, आपली थकीत कररक्कम वेळेत भरून नगरपंचायतीच्या विकासकामांना सहकार्य करावे, जेणेकरून निफाड शहराचा विकास अधिक वेगाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने साधता येईल.

# 'कर्तव्यपथा'वर सिल्लोडच्या कलेचा गौरव! केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा चित्ररथ साकारण्यात प्रा. प्रदीप कुमावत यांचा मोलाचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** नवी दिल्ली येथील कर्तव्यपथावर पार पडलेल्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सादर केलेल्या 'प्राचीन मुळे, डिजिटल पंख' या संकल्पनेवरील चित्ररथाने देशाचे लक्ष वेधून घेतले. भारताच्या गौरवशाली ज्ञानपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या या चित्ररथाच्या निर्मिती पथकात सिल्लोड येथील सुपुत्र प्रा. प्रदीप कुमावत यांचा समावेश असल्याने तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.




भारताच्या ज्ञानपरंपरेला आधुनिकतेची जोड देणारा हा चित्ररथ यंदा आकर्षणाचे केंद्र ठरला. यात खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्टांच्या शून्यापासून ते आजच्या डिजिटल युगातील स्मार्ट क्लासरूमपर्यंतचा प्रवास कलात्मकरीत्या मांडण्यात आला. मुंबईच्या प्रतिष्ठित 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट' (अभिमत विद्यापीठ) कडे या चित्ररथ निर्मितीची जबाबदारी सोपवण्यात आली होती. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. हिम चॅटर्जी व कुलसचिव शशिकांत काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. विजय सकपाळ यांनी या निर्मिती पथकाचे नेतृत्व केले. या निवडक कलाकारांच्या ताफ्यात सिल्लोडचे प्रा. प्रदीप कुमावत यांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपली कलात्मक मोहोर उमटवली.

**चित्ररथाची वैशिष्ट्ये:**

या चित्ररथाच्या अग्रभागी शून्याचे जनक आर्यभट्ट यांचे भव्य शिल्प साकारण्यात आले होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील 'जादुई पिटारा', मातृभाषेतील शिक्षण, रोबोटिक हात आणि व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) वापरून शिकणारी मुले अशा विविध संकल्पनांतून 'विकसित भारत २०४७' चे स्वप्न कर्तव्यपथावर मांडण्यात आले.

हा चित्ररथ साकारण्यासाठी गेल्या चार महिन्यांपासून दिल्लीत काम सुरू होते. सुमारे ६० निष्णात कलाकार आणि तंत्रज्ञांच्या चमूमध्ये प्रा. कुमावत यांनी अत्यंत बारकाव्यांसह या संकल्पनेला मूर्त स्वरूप दिले. अमूर्त शैक्षणिक धोरण एका हलत्या चित्ररथातून लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचे मोठे आव्हान या चमूने यशस्वीपणे पेलले.

प्रा. प्रदीप कुमावत यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील कामगिरीबद्दल सिल्लोड तालुक्यात त्यांचा सार्थ अभिमान बाळगत आनंद व्यक्त केला जात आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील उदयोन्मुख कलाकारांना नवी प्रेरणा मिळाली असून, सर्वस्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिल्हा न्यायालयात ध्वजारोहन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा न्यायालयात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश दिनेश सुराणा यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रवीण उन्हाळे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष रोशन बागडे, न्यायाधीश, वकील तसेच अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी पोलीस विभागाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. पोलीस विभागाच्या बँड पथकाने राष्ट्रगीत व राज्यगीत सादर केले. यावेळी न्या. दिनेश सुराणा यांनी उपास्थितांना शुभेच्छा दिल्या.



# पतीच्या प्रचारासाठी पत्नी सरसावली

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे/पाथरी :** पतीच्या सामाजिक व सार्वजनिक जीवनातील कार्याला बळ देण्यासाठी सौभाग्यवती किरण दत्तराव मायंदळे स्वतः पुढे येत हे दृश्य समाजात क्वचित पाहायला मिळते अशी प्रेरणादायी भूमिका सौभाग्यवती किरण मायंदळे यांनी सध्या पार पाडत आहेत पतीच्या प्रचारासाठी त्या उत्साहाने आणि जबाबदारीने काम करीत असून नागरिकांमध्ये त्यांचे विशेष कौतुक केले जात आहे सौभाग्यवती किरण मायंदळे यांनी प्रचारादरम्यान घरोघरी भेटी देत मतदारासी संवाद साधत आहेत पतीच्या कामाचा आढावा घेत त्यांच्या विकासात्मक दुष्टकोन यांची माहिती त्या नागरिकांपर्यंत पोहोचवत आहेत युवक महिला जेष्ठ नागरिकांशी थेट संवाद साधुन त्यांनी सकारात्मक वातावरण निर्माण करीत आहेत त्यांचा हा सहभाग केवळ कौटुंबिक कर्तव्यापुरताच मार्यादित न राहता सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारी ठरत आहे माझ्या पतीने नेहमीच नागरिकांसाठी कामे केली त्यांच्या कार्याला जनतेचा पाठिंबा मिळावा हिचं माझी इच्छा आहे आसे मत दत्तात्रय मायंदळे यांच्या पत्नी सौभाग्यवती किरण मायंदळे यांनी व्यक्त केले त्यांच्या या कार्यामुळे प्रचाराला नवी ऊर्जा मिळत असून तरूण पिढीने सामाजिक व लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा असा संदेश ही सौभाग्यवती किरण दत्तात्रय मायंदळे यांच्या पत्नीने यावेळी सांगितले

# रेणाखळी शाळेत 'स्वामी विवेकानंद ग्रंथालय'चा शुभारंभ

## माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून 500 पुस्तकांचे योगदान; वाचनसंस्कृतीला नवी दिशा

**दैनिक युवक आधार**

**पाथरी प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील रेणाखळी येथील पीएमश्री प्राथमिक व माध्यमिक जिल्हा परिषद शाळेत माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून साकारलेले 'स्वामी विवेकानंद ग्रंथालय' प्रजासत्ताक दिनी (दि. 26 जानेवारी) मोठ्या उत्साहात सुरू करण्यात आले. सुमारे 500 पुस्तकांच्या योगदानासह या ग्रंथालयाच्या कार्याचा शुभारंभ होताच शाळेत ज्ञानाची नवी दारे उघडली आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजवणे, बौद्धिक विकास घडवणे आणि स्पर्धात्मक युगासाठी त्यांना सज्ज करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, प्रेरणादायी साहित्य व शैक्षणिक पुस्तके उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला आणि सर्वांगीण प्रगतीला मोठी चालना मिळणार आहे.

हा उपक्रम माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून साकारण्यात आला. संघाचे अध्यक्ष आसाराम बालासाहेब विरकर, उपाध्यक्ष आत्माराम पिराजी हारकळ, कोषाध्यक्ष विजय महावीरप्रसाद छाबडा, सल्लागार सदस्य वैजनाथ प्रभू गिरी तसेच सचिव व मुख्याध्यापक रामराव भिमराव गिराम यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी व सदस्यांनी एकत्र येत हे कार्य यशस्वी केले.

उद्घाटनप्रसंगी मुख्याध्यापक रामराव गिराम, माजी शिक्षक विनायक कुलकर्णी, सरपंच राहुल ब्रह्मराक्षे, माजी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उद्धव इंगळे, शाळेतील शिक्षकवृंद,



ग्रामपंचायत सदस्य शे. आलिम भाई, दादाराव हारकळ, तुकाराम हारकळ, रमेश इंगळे, गोविंद चिंचाणे, अध्यक्ष परमेश्वर हारकळ, ग्रामसेवक काकडे तसेच मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.सर्व मान्यवरांनी माजी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत, ग्रंथालयाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. येत्या काळात अधिक पुस्तके, आवश्यक साधनसामग्री, वाचनासाठी स्वतंत्र सुविधा उभारून ग्रंथालय अधिक आधुनिक करण्याचा संकल्प माजी विद्यार्थी संघाने व्यक्त केला.या उपक्रमामुळे रेणाखळी गावात शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी माजी विद्यार्थी संघ पुढेही विविध उपक्रम राबविणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

ज्ञानदानाच्या या उपक्रमाचे गावकऱ्यांनी मनापासून स्वागत करून, 'ग्रंथालय म्हणजे उज्वल भविष्याची पायाभरणी' असल्याची भावना व्यक्त केली.

# स्पर्धा परीक्षांद्वारे स्वतःची गुणवत्ता सिद्ध करा - प्रा डॉ. रंजित गायके

**दैनिक युवक आधार**

**सेलू/प्रतिनिधी/शिवाजी पवार :** पीसीएमबी सायन्स अकॅडमी, सेलू येथे इयत्ता 10 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले प्रा. डॉ. रंजीत गायके सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 12 वी नंतरच्या भविष्यातील संधी शोधताना बोर्ड परीक्षा, नीट, जेईई, सीईटी यांसारख्या स्पर्धा परीक्षांद्वारे स्वतःची गुणवत्ता सिद्ध करा आणि स्पर्धेच्या युगात येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित करा.करिअर अभ्यासक श्री.सुधीर डीक्कर सर यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेत असताना आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर निवडण्याचा सल्ला दिला तसेच निवडलेल्या करिअरमध्ये न डगमगता अहोरात्र प्रामाणिक प्रयत्न करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.संकल्प अकॅडमीचे संचालक प्रा. खंदारे सर यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या वयात योग्य शिक्षण घेऊन स्वतःचे अस्तित्व सिद्ध करावे, असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले.यावेळी श्री. किरण खरात सर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून, आई-वडिलांच्या विश्वासाला कधीही तडा जाणार नाही असे वर्तन ठेवण्याचे आवाहन केले. या सर्व मान्यवरांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या मनात भविष्याविषयी नवचैतन्य निर्माण झाले. हा निरोप समारंभ यशस्वी होण्यासाठी सर्व विद्यार्थी व स्टाफ यांनी विशेष परिश्रम घेतले.



# पनवेल तालुक्यात भाजप महायुतीचा प्रचार शिगेला; वावंजे गट व पंचायत समिती गणात जोरदार शक्तीप्रदर्शन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल तालुक्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीच्या प्रचाराने वेग घेतला असून वावंजे जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणात महायुतीच्या उमेदवारांनी प्रभावी प्रचार करत आघाडी घेतली आहे. खैरणे आणि कानपोली परिसरात काढण्यात आलेल्या पदयात्रांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी तसेच ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या उमेदवारांनी मतदारांच्या गाठीभेटी घेत विकासकामांची माहिती दिली. महायुतीच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास प्रकल्पांमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून प्रचारादरम्यान त्याचा स्पष्ट प्रत्यय येत आहे.

वावंजे जिल्हा परिषद गटातून उमेदवार कमला देशेकर आणि वावंजे पंचायत समिती गणातून उमेदवार आरती काठे यांच्या प्रचारासाठी कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. गावोगावी प्रचार करत मतदारांशी थेट संवाद साधण्यात आला. या प्रचारावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष



प्रल्हाद केणी, भाजप नेते एकनाथ देशेकर, पनवेल महापालिकेच्या नगरसेविका सीता पाटील यांच्यासह नगरसेविका अरुणा दाभणे, शिवाजी दुर्गे, कृष्णा पाटील, डॉ. मोतीराम कोळी, नाथा आगलावे, जनार्दन आगलावे, काजल पाटील, माजी दिलीप वास्कर, महेश पाटील, वासुदेव पाटील, राजेंद्र गोंधळी, चंद्रकांत गोंधळी, प्रभाकर पाटील, सुरेश पोरजी, अंकुश पाटील, कैलास मढवी, सज्जन पवार, रमेश मते, गोमा पाटील, संजोग पाटील, भार्गव सांगडे, बाळकृष्ण पाटील, निवृत्ती पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषद उमेदवार कमला देशेकर यांनी यापूर्वी सरपंच म्हणून केलेल्या उत्कृष्ट कामाचा जनतेला अनुभव आहे, तर पंचायत समिती उमेदवार आरती काठे या सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय राहिल्या आहेत. जनतेमध्ये जाऊन प्रत्यक्ष काम करणे हा त्यांचा स्वभाव असल्याने दोन्ही उमेदवारांना मतदारांचा वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे.

# पनवेलमध्ये राजकीय भूकंप; शेकापक्षाचे नेते विश्वास भगत यांच्यासह हजारो कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल; शेकापक्षाला मोठा हादरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात राजकीय भूकंप घडला असून शेतकरी कामगार पक्षाला मोठा हादरा बसला आहे. पळस्पे जिल्हा परिषद गटातील उसर्ली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते विश्वास भगत यांनी आपल्या हजारो समर्थक व कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे.या भव्य पक्षप्रवेशामुळे पळस्पे मतदारसंघातील शेकापक्षाची संपूर्ण राजकीय घडी विस्कटल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत आहे. उसर्ली येथील दीप सिटी येथे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा जल्लोषात पार पडला.

यावेळी विश्वास भगत यांच्यासोबत ग्रामपंचायत सदस्य संजय भगत, अर्चना भगत, माजी सरपंच करुणा भगत, हरेश्वर भगत, राकेश भगत, अमित भगत, मोहन भगत, डेरवली पंच कमिटीचे अध्यक्ष संतोष शेळके, रामदास शेळके, विविध सोसायटींचे पदाधिकारी आणि हजारो शेकाप कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश करत शेतकरी कामगार पक्षाची दयनीय अवस्था केली.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्रांच्या घरांवर सिडकोकडून अन्याय होत असेल, तर तो कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. अन्यायाविरोधात कडाडून विरोध करण्याची आमची भूमिका पूर्वीपासूनच राहिली असून, त्यासाठी आम्ही व आमचे कार्यकर्ते पूर्णपणे सज्ज आहोत, असेही त्यांनी नमूद केले. वाढत्या नागरीकरणामुळे परिसरातील गावांचे स्वरूप बदलत असून, या भागात नैना प्राधिकरण येत आहे. त्या अनुषंगाने नागरिकांच्या हिताला बाधा पोहोचवणाऱ्या चुकीच्या निर्णयांना कायम विरोध केला जाईल, असे आमदार प्रशांत ठाकूर ठाकूर यांनी स्पष्ट केले. सिडकोकडून राहत्या घरांवर प्लॉट टाकण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे या प्रकल्पामुळे नुकसान होऊ नये, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे सांगत अटल सेतू व विमानतळामुळे हा परिसर थेट मुंबईशी जोडला गेला असल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबईपेक्षाही अधिक सुविधा या भागात उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचा विश्वास व्यक्त करत, येत्या निवडणुकीत नागरिकांनी आम्हाला साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. भविष्यातही नागरिकांच्या हिताचे संरक्षण करण्याची जबाबदारी आम्ही पार पाडू, असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिले.






पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी आपल्या मनोगतातून बोलताना शेकापची झालेली बिकट अस्वस्थेवर भाष्य केले. विश्वास भगत यांच्या भाजप प्रवेशामुळे शेकापला आता पोलिंग एजंट आणि बुथवर बसायला कार्यकर्ते मिळतील का ? अशी परिस्थिती या भागात झाली आहे, असा सणसणीत टोला शेकापच्या पुढाऱ्यांना लगावला. तसेच यापुढील काळात विश्वास भगत आमदार प्रशांत ठाकूर यांचे खंदे कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणार आहेत, असेही त्यांनी अधोरेखित केले. या पक्षप्रवेश कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा सरचिटणीस व पनवेल महानगरपालिकेतील भाजप महायुतीचे गटनेते नितीन पाटील, माजी शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, नगरसेवक एकनाथ गायकवाड, अजय बहिरा, महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, माजी नगरसेवक सुनिल बहिरा, प्रभाकर बहिरा, विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, जयवंत भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अतुल घरत, माजी सरपंच अतुल तांबे, मच्छिंद्र पाटील, संजय भगत, नितीन भगत, हेमंत भगत, मुकेश भगत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सटाण्यात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा;महिला नगराध्यक्षांनी फडकवीला भारतीय तिरंगी झेंडा

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी-दीपक गायकवाड :** दि.२६ जानेवारी २०२६ रोजी पहिल्या थेट लोकनियुक्त महिला नगराध्यक्ष यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत सटाणा नगरपरिषद प्रशासकीय इमारतीवर आणि महात्मा गांधी चौकात नगरअध्यक्ष हर्षदा राहुलबाबा पाटील यांच्या शुभहस्ते तिरंगा ध्वज फडकवण्यात आला.तर लोकमान्य टिळक रस्त्याच्या हुतात्मा स्मारक येथे उपनगराध्यक्ष सुमित विजयराज वाघ, यांच्या शुभहस्ते तिरंगा ध्वज फडकवण्यात आला. सटाणा शहरातील सर्व सार्वजनिक पुतळे तथा स्मारक ज्यात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, हुतात्मा स्मारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध, डॉ. भुतेकरबाबा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महात्मा गांधी यांना नगराध्यक्ष व उपाध्यक्ष आणि सर्व नगरसेवक यांनी पुष्पांजली अर्पण केली.



यावेळी सटाणा नगरपरिषदेच्या इतिहासात पहिल्यांदा माजी नगराध्यक्ष व नगरसेवक यांना देखील महात्मा गांधी चौकातील ध्वजवंदनेस विद्यमान नगराध्यक्ष यांनी आदरपुर्वक विशेष निमंत्रित केले होते, त्यात माजी नगराध्यक्ष पांडुरंग काशिराम सोनवणे व कौशल्याताई पांडुरंग सोनवणे, ९० वर्ष वयाचे जेष्ट माजी नगरसेवक कन्हैयालाल शिवप्रसाद पाठक यांच्यासह जनार्दन धनजी सोनवणे, अरविंद काशिराम सोनवणे, दिलीप देवराम बगडाने, रामदास यादव सोनवणे, जयवंत दिलीप पवार, लता शिवाजी सोनवणे हे आवर्जुन उपस्थित होते.शिवसेना गटनेता राहुल सुभाष पाटील, भारतीय जनता पार्टीचे गटनेता चेतन रौंदळ, श्री देव मामलेदार गटाचे गटनेता ऍडव्होकेट मनिषा जयवंत पवार यांच्यासह नगरसेवक सीमा पंकज सोनवणे, जयश्री साहेबराव गरुड, संगीता देवेंद्र सोनवणे, तनुजा किरण नांद्रे, महेश नानाभाऊ सोनवणे, सोनाली दत्तू बैताडे, अलका लखन बोरसे, मंगेश विजय खैरनार, चेतन अशोक मोरे, कल्पना दयाराम सोनवणे, विलास भालचंद्र दंडगव्हाळ, मनिषा दीपक पाकळे, लताबाई पोपट बच्छाव, मुल्ला रऊफ शहा, नितीन दगाजी सोनवणे, सुनंदा रमेश देवरे तसेच नामनिर्देशित सदस्य रोशन नंदलाल सोनवणे व अनिल केदा पाकळे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी आणि जिजामाता हायस्कूलचे शिक्षक व विद्यार्थीनी, ग्रामस्थ व पत्रकार उपस्थित होते.

महात्मा गांधी चौकात उपस्थित सर्व आजी व माजी नगरसेवक व सेवानिवृत्त आणि विद्यमान कर्मचारी, विद्यार्थी व उपस्थित नागरीक या सर्वांना नगराध्यक्ष यांनी स्वखर्चाने आणलेला अल्पपोहार उत्साहवर्धकरित्या सर्व विद्यमान नगरसेवकांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आला.

## सौ माधुरी भिसे यांचा सणसर लासुर्णे गटात विजय निश्चित !

### प्रचारासाठी गटातील युवकांची मोठी फळी सज्ज

### इंदापूर मध्ये दोन बडे नेते एकत्र आल्याने होणार फायदा !

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील राजकारण वेगळेच वळण घेत असून महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांची इंदापूर तालुक्यात झालेली युती ही सर्वसामांन्य जनतेला आनंदाची झाली असून,प्रमुख कार्यकर्त्यांसह तालुक्यातील मतदारांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात आनंदी वातावरण तालुक्यात पाहायला मिळत आहे.स्वतःच्या सोयीच्या राजकारणासाठी केलेली ही अभद्रयुती असल्याचे आरोप तालुक्यातील विरोधक करु



लागले आहेत. त्यामुळे या युतीला फार मोठा फटका सणसर लासुर्णे गटामध्ये बसणार नाही. असे येथील मतदार आणि दोन्ही पक्षातील प्रमुख कार्यकर्तेच बोलू लागले आहेत.त्यामुळे सौ.माधुरी सागर भिसे यांचे आज तरी या सणसर लासुर्णे गटामध्ये पारडे जड असल्याचे पाहायला मिळत आहे. इंदापूर तालुक्यातील सणसर आणि लासुर्णे हे मोठे गावे असून या ठिकाणी मोठी बाजारपेठ आहे. सध्या या गटातील राजकारण या गावातच शिजत असून दररोज मा सागर बाळासाहेब भिसे यांच्याच नावाची चर्चा प्रत्येक चौकात आणि हॉटेलमध्ये पाहायला मिळत आहे. आणि सर्वसामान्य मतदारांच्या बोलण्यात फक्त सागर बाळासाहेब भिसे आज तरी दिसत आहेत, त्यामुळे या युतीचा फटका भाजपाला बसल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे सौ माधुरी सागर भिसे यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

## श्रीवर्धनमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन देशभक्तीच्या जल्लोषात साजरा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी /अनिकेत मोहित :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त श्रीवर्धन शहरात सर्वत्र उत्साह, अभिमान आणि देशभक्तीचे वातावरण पाहायला मिळाले. शहरातील शासकीय कार्यालये, नगरपरिषद, शाळा, चौक व सार्वजनिक ठिकाणी ध्वजारोहणाचे सोहळे मोठ्या थाटात पार पडले.

श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयात उपनगराध्यक्ष श्री. अनंतजी गुरव यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे नगराध्यक्ष एडवोकेट श्री. अतुल चौगुले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर मध्यवर्ती प्रशासकीय भवन येथे प्रांत अधिकारी श्री. महेश पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला.या सर्व प्रमुख ठिकाणी पोलिस दलाकडून राष्ट्रीय झेंड्यास मानवंदना देण्यात आली. मध्यवर्ती प्रशासकीय भवन, नगरपरिषद परिसर आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पोलिस पथकाने शिस्तबद्ध संचलन करून राष्ट्रध्वजाला सलामी दिली. देशभक्तीपर घोषणांनी आणि गीतांनी संपूर्ण परिसर भारावून गेला होता.

शहरातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी, देशभक्तीपर गीते, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून प्रजासत्ताक दिनाचा उत्सव रंगतदार केला. लहानग्यांपासून ते ज्येष्ठ नागरिक आणि माजी सैनिक



सर्वांनी या सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आपल्या भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि वंदे मातरम प्रार्थना बोलण्यात आली यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणांतून भारतीय संविधानाचे महत्त्व, स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि लोकशाही मूल्ये जपण्याची जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. "राष्ट्र प्रथम" या भावनेतून प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावावे, असे आवाहनही करण्यात आले.एकूणच श्रीवर्धनमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत शिस्तबद्ध, गौरवशाली आणि राष्ट्राभिमान जागवणाऱ्या वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा झाला.

# आदर्श पतसंस्था उभारणे हे जिकिरीचे कार्य – नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात शिक्षक आधुनिकतेची कास धरून आदर्श विद्यार्थी घडवत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे. मात्र आज पतसंस्था काढणे सोपे असले, तरी ती शिस्तबद्ध व पारदर्शकपणे चालवून आदर्श पतसंस्था उभारणे हे जिकिरीचे कार्य असल्याचे प्रतिपादन संगमनेरच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी केले.

निफाड तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या "गुणवत्ता पारितोषिक वितरण" समारंभात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे उपस्थित होते.

डॉ. मैथिली तांबे पुढे म्हणाल्या की, "शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नाच्या निराकरणासाठी आमचा संपूर्ण परिवार सदैव कटिबद्ध आहे."

कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे यांनी शिक्षक पतसंस्थेच्या कामकाजाचा आलेख सातत्याने उंचावत असल्याचे सांगत, बोर्ड परीक्षेत प्रथम येणाऱ्या प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांचा सन्मान पतसंस्थेच्या वतीने करण्यात यावा, अशी सूचना मांडली.

यावेळी व्यासपीठावर निवृत्तीनाना थेटे, शिवाजीराव निरगुडे, कैलास भारती, भास्करराव भगरे, राहुल दवते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते तालुक्यातील आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भास्करराव भगरे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष बिऱ्हाडे व भालचंद्र सूर्यवंशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन राहुल दवते यांनी मानले. कार्यक्रमास तालुक्यातील शिक्षक परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

**पुरस्कारार्थी मान्यवर**

आदर्श शिक्षक व कर्मचारी पुरस्काराने सुनिता शिंदे, महेश अहिरे, संतोष बिऱ्हाडे, संदीप दाभाडे, सुभाष चौधरी, संगिता देशमाने, धर्मेंद्र निकम, योगिता पवार, कैलास पातळे, भारती लंबाते, किरण पाचपुते यांना सन्मानित करण्यात आले.

**अकरा हजार रुपयांची देणगी**

निफाडची वाचन संस्कृती जोपासणारे १०७ वर्षे पूर्ण केलेले श्री माणकेश्वर वाचनालय व न्या.





रानडे स्मारक येथे कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे यांनी भेट देऊन अकरा हजार रुपयांची देणगी दिली. वाचनालयाच्या वतीने अध्यक्ष मधुकरराव शेलार, चिटणीस बाळासाहेब कापसे आदींनी त्यांचा सन्मान केला.

## शिवपुरी येथे जि प प्रा शाळा ता हदगाव जि नांदेड येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नांदेड/शिवपुरी/विश्वदीप कांबळे :** शिवपुरी/जि प प्रा शाळा शिवपुरी २६ जानेवारी २०२६ रोजी भारत देशाचा ७७ वा प्रजासत्ताकदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शिवपुरी नगरीचे सरपंच सौ सूनिता अवधुत तेलुरे व सरस्वती संतोष कड उपसरपंच यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष रामा कांबळे उपाध्यक्ष . प्रकाश हवरगे. बंटी करे गोविंद माने दत्ता जाधव विकास पवार सिद्धार्थ कांबळे गंगाधर बकवार कैलास माने बबुस बकवार वैजनाथ थोरात प्रमुख अतिथी म्हणून केंद्र प्रमुख मोरे सर.गावचे पोलिस पाटील संतोष घारके व सर्व ग्रा पं.सदस्य समस्त गावकरी मंडळी उपस्थित होते. सुत्रसंचलन सहशिक्षक धोपे मॅडम सोनोळे सर लोणे मॅडम (मुख्याध्यापिका)यांनी केले. . यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# लोकशाहीचा कणा म्हणजे मतदान; प्रत्येक मत अमूल्य - जिल्हाधिकारी मा.विवेक जॉन्सन

## दिव्यांग मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती आवश्यक – जिल्हा राजदूत राजेंद्र लाड

**दैनिक युवक आधारे**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे :** भारत निवडणूक आयोग व महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. “माझा भारत… माझं मत… मी भारत आहे” या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड येथील सभागृहात सकाळी ११.३० वाजता संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. विवेक जॉन्सन साहेब (जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, बीड) हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मा. श्रीम. कविता जाधव मॅडम (उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, बीड), मा. श्री. शैलेश सूर्यवंशी साहेब (उपजिल्हाधिकारी, बीड), मा. श्री. चंद्रकांत शेळके (तहसीलदार, बीड) तसेच राजेंद्र लाड (दिव्यांग मतदार नोंदणी – बीड जिल्हा राजदूत) यांचा समावेश होता. यावेळी सुरेंद्र डोके (नायब तहसीलदार, निवडणूक), उपप्राचार्य श्रीम. अनिता शिंदे मॅडम, श्रीम. नर्मदा उगलमुगले मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन साहेब म्हणाले की, “लोकशाहीचा कणा म्हणजे मतदान असून प्रत्येक नागरिकाने आपला हक्क बजावला पाहिजे. लोकशाहीमध्ये प्रत्येक मतदाराचे मत अमूल्य आहे. त्यामुळे प्रत्येकाने जागृत व सजग राहून मतदान करावे.” १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकाने मतदार नोंदणी करून मतदान करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मतदान न केल्यास योग्य नेतृत्व निवडण्याची संधी आपणच गमावतो, असे स्पष्ट करत युवकांनी स्वतः मतदान करून इतरांनाही मतदानासाठी प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी केले. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक व



महिलांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सुविधा वापरून निर्भयपणे मतदान करावे, असे सांगत स्वच्छ, निर्भय व निष्पक्ष मतदानातूनच सशक्त लोकशाही घडते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी दिव्यांग मतदार नोंदणी विभागाचे बीड जिल्हा राजदूत राजेंद्र लाड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, “दिव्यांग व्यक्तीही लोकशाहीचा समान भाग असून त्यांचा मतदानाचा हक्क तितकाच महत्त्वाचा आहे.” दिव्यांग मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन करत त्यांनी निवडणूक आयोगामार्फत दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हीलचेअर, सहाय्यक, ब्रेल ईव्हीएम, प्राधान्य मतदान अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याची माहिती दिली.

मतदान प्रक्रियेत दिव्यांग मतदारांना सन्मान, सुलभता व गोपनीयता मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कुटुंबीय व प्रशासनाने दिव्यांग मतदारांना मतदानासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करत दिव्यांग मतदारांच्या सक्रिय सहभागातून समावेशक व बळकट लोकशाही निर्माण होते, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त दिव्यांग मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती वाढवण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

१६ व्या राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून लोकसभा, विधानसभा तसेच पदवीधर मतदार संघाच्या मतदार नोंदणी व मतदार यादी तयार करण्याच्या कामात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल निवडणूक विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये सुरेंद्र डोके (नायब तहसीलदार, निवडणूक तहसील कार्यालय बीड), श्रीम. नर्मदा उगलमुगले मॅडम (नायब तहसीलदार), सचिन गायकवाड, विश्वजित लांडगे, रविंद्र कुलकर्णी, श्रीम. प्रेरणा लांडगे, सचिन कुलकर्णी, कैलास सुतार, रवि पांगरे यांच्यासह जिल्हा व तालुका निवडणूक विभागातील अधिकारी, कर्मचारी, केंद्रस्तरीय अधिकारी व सेवकांचा मा. जिल्हाधिकारी यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपजिल्हाधिकारी मा. श्री. शैलेश सूर्यवंशी यांनी केले. त्यांनी राष्ट्रीय मतदार दिनाचा इतिहास व महत्त्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास सुतार यांनी केले, तर आभार प्रदर्शन तहसीलदार मा. श्री. चंद्रकांत शेळके यांनी केले. याप्रसंगी प्रा. गणेश कदम यांनी सर्व उपस्थितांना राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ दिली.

या कार्यक्रमास नव मतदार, एनसीसीचे विद्यार्थी, जिल्हा व तालुका निवडणूक विभागातील अधिकारी-कर्मचारी, केंद्रस्तरीय अधिकारी, शिक्षक, प्राध्यापक तसेच सौ. के. एस. के. महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून मतदानाबाबत जागृती होऊन लोकशाही अधिक सक्षम होण्याचा संदेश देण्यात आला.

# जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

जिल्हाधिकाऱ्यांसह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी भारतीय ध्वजास मानवंदना दिली. पोलीस विभागाच्या बँड पथकाने यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीत सादर केले. अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.



# जि. प .प्रा. शाळा पापळ येथील शाळेतील विद्यार्थ्यांचा बालकलाकाराचा ज्ञान कला उत्सव

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी/ अनिल ससाने :** जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील पापळ येथील जि. प. प्रा. शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ठीक ७ .४५ वाजता नवनिर्वाचित शालेय समितीचे अध्यक्ष अनिता बाबासाहेब मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला त्यानंतर विद्यार्थ्यांनी लेझीम, टिपऱ्या नृत्य, कयावत व भाषण केले त्यानंतर सायंकाळी ७.०० वाजता बाल कलाकारांचा ज्ञान कला उत्सव या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली दीपप्रज्वलन श्री. छगनराव इंगळे



सेवानिवृत्त (डी वाय एसपी) यांच्या हस्ते करण्यात आले व महापुरुषांच्या फोटोचे पूजनश्रीफळ फोडणे श्री नामदेव पाटील कुहीरे ,(सरपंच) व अनिल ससाने (उपसरपंच)यांनी केले व मान्यवराचा सत्कार श्री प्रल्हाद मोरे, श्री विजय मोरे, सुनील ससाने यांनी केले कार्यक्रमाला उपस्थित असलेले शाळेचे केंद्रप्रमुख श्री. व्ही. टी. जायभाये सर यांचा सत्कार शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. एम .जाधव सर यांनी केली या कार्यक्रमामध्ये एकूण ३० ते ३१ गाणे बसवलेले होते त्यामध्ये १५ ते १८ गाणे देशभक्तीवर होते प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रमास पापळ गाव वाशी यांनी भरभरून साथ दिली व बक्षीस सुद्धा दिली या कार्यक्रमास गावातील आजी माजी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत आजी माजी सदस्य आजी माजी तंटामुक्ती अध्यक्ष शालेय समिती आजी माजी अध्यक्ष व समिती तसेच सर्व पक्षाचे कार्यकर्ते, पोलीस पाटील, सोसायटी चेअरमन ,रेशन दुकानदार विद्यार्थी व गावकरी मंडळी इत्यादी या कार्यक्रमास उपस्थित होते, शाळेसाठी सहकार्य करणारे अतुल साऊंड सिस्टिम चे मालक श्री. मुरली भाऊ जाधव, लहु शस्त्र सेना तालुका अध्यक्ष श्री. सुनील भाऊ ससाणे भाजपा कार्यकर्ते श्री ज्ञानेश्वर पवार श्री प्रल्हाद मोरे श्री विशाल संतोष ससाने इत्यादी लोकांने शिक्षकास मदत केली बालकलाकारांचा ज्ञान कला उत्सव श्री मुंडे सर, श्री जाधव सर, श्री वरशीळ सर, श्री माटे सर, श्री पाटील सर या शिक्षकांनी अतिशय परिश्रम करून कार्यक्रम घडून आणला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बुधवत सर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता शाळेची मुख्याध्यापक जाधव सर यांनी केली.

# गोंदियातील बेरोजगारांसाठी सुवर्णसंधी: भीम आर्मीच्या पुढाकाराने १३०० तरुणांना मिळणार हक्काचा रोजगार!

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी (गोंदिया) :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध करून देण्यासाठी भीम आर्मी-भारत एकता मिशन, जिल्हा गोंदिया यांच्या वतीने एका भव्य ‘रोजगार मेळाव्याचे’ आयोजन करण्यात आले आहे. "आता प्रत्येक परिवार होईल सुखी-संपन्न" या ध्येयाने आयोजित या मेळाव्यात नामांकित कंपन्यांमध्ये तब्बल १३०० रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे.

**प्रमुख कंपन्या आणि पात्रता:**

या मेळाव्यात विविध




क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष मुलाखती घेणार आहेत:

LIC Of India: फक्त महिलांसाठी (वय: २० ते ४५ वर्षे)

RelyFinance Service Pvt Ltd: फक्त पुरुषांसाठी (फायनान्शिअल सर्व्हिसेस)

Tata Company & Quess Company: विविध पदे

सम्राट अशोक सिक्युरिटी गार्ड: फक्त पुरुषांसाठी (वय: १८ ते ३५ वर्षे)

सक्षम सोलर इलेक्ट्रिसिटी: (ITI आणि डिप्लोमा धारकांसाठी, वय: २० ते ३५ वर्षे)

महत्त्वाची माहिती:

शैक्षणिक पात्रता: १२ वी उत्तीर्ण व त्यापुढील सर्व पदवीधर.

आवश्यक कागदपत्रे: उमेदवारांनी स्वतःचा बायोडाटा (Resume), फोटो आणि शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रतींचे (Xerox sets) सोबत आणणे अनिवार्य आहे.

**मेळाव्याचा तपशील:**

दिनांक: २७ जानेवारी २०२६ (मंगळवार)

वेळ: सकाळी १०:०० वाजेपासून

स्थळ: सक्षम सोलर इलेक्ट्रिसिटी ऑफिस, भीम आर्मी जिल्हा जनसंपर्क कार्यालयाजवळ, गद्दाटोली, बजाज हॉस्पिटल जवळ, गोंदिया.

आवाहन: गोंदिया जिल्ह्यातील जास्तीत जास्त तरुण-तरुणींनी या संधीचा लाभ घेऊन आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहन भीम आर्मी-भारत एकता मिशन, जिल्हा गोंदिया तर्फे करण्यात आले.

# सेंट जोसेफ हायस्कूल, नवीन पनवेल येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** सेंट जोसेफ हायस्कूल (एस.एस.सी.), न्यू पनवेल येथे २६ जानेवारी २०२६ रोजी भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. संपूर्ण शाळा तिरंग्याने सजविण्यात आली होती आणि परिसर अभिमान व एकतेच्या भावनेने भारलेला होता.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपणाने करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश सिंग, कॅप्टन, डॉ. सोनाली जोशी (डॉक्टर व कौन्सिलर), ॲड. नागेश अरविंद हिरवे निसर्गप्रेमी आणि रायगड जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशन, सुरेखा प्रशांत भुजबळ (संस्थापक व विश्वस्त,



संस्कार प्रतिष्ठान) आणि योगेश भालचंद्र कडलास्कर (मालक, अर्जुन उद्योग महामंडळ) उपस्थित होते. सुरेश सिंग – कॅप्टन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत व ध्वजगीत गायन झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध मार्चपास व पथक सादर करून शिस्त, एकता आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश दिला. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्ये, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शाळेत आयोजित विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आपल्या अनुभवातून प्रेरणादायी विचार व्यक्त केले. रायन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या ५० गौरवशाली वर्षांच्या पूर्ततेनिमित्त विद्यार्थ्यांनी सादर केलेले विशेष स्मारक नृत्य हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शन व शालेय गीताने करण्यात आला. हा कार्यक्रम विद्यार्थी व शिक्षकांमध्ये राष्ट्रीय अभिमान, एकता आणि देशप्रेमाची भावना जागृत करणारा ठरला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. ए. एफ. पिंटो आणि व्यवस्थापकीय संचालिका डॉ. ग्रेस पिंटो यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# पहिल्या महिला तहसीलदार यांच्या हस्ते ध्वजारोहण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल तहसील कार्यालयाच्या पहिल्या महिला तहसीलदार मीनल भामरे-भोसले यांच्या हस्ते 26 जानेवारी निमित्त तहसील कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले.

पहिल्या महिला तहसीलदार यांच्या हस्ते 77 वा प्रजासत्ताक दिन पनवेलमध्ये साजरा करण्यात आला. सकाळी 7.45 वाजता ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला पनवेल तालुक्यातील आजी-माजी स्वातंत्र्यसैनिक, सैनिक, नायब तहसीलदार राजश्री जोगी, मंडळ अधिकारी, तलाठी सर्व कर्मचारी तसेच पनवेल तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.



# योगेश्वर विद्यालय दावचवाडी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक// विनोद गायकवाड :** दावचवाडी, येथे आज न्यायमूर्ती रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित, योगेश्वर विद्यालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे ध्वजारोहण न्या.रानडे विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त प्रभाकर आण्णा कुयटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी सरपंच अशोक धुमाळ, तलाठी गोरक्षनाथ ठोकळे, सोसायटी चेअरमन संजय कुयटे, पोलीस पाटील शालन शिंदे, स्कूल कमिटी सदस्य शीला आहिरे,गोरखनाथ कुयटे, दिनकर कुयटे,




रविंद शिंदे,रावसाहेब जाधव, नितीन लोखंडे, चांगदेव लोखंडे कोतवाल माधुरी आहिरे, आदी. उपस्थित होते. सकाळी ७:३० वाजता मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या जयघोष करणाऱ्या घोषणा दिल्या. विद्यालयाच्या एमसीसी पथकाने भारतीय तिरंग्यास मानवंदना दिली. तसेच स्कूल कमिटी सदस्य पंकजभाऊ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना कॉपी मुक्त अभियान शपथ दिली. तर दावचवाडी ग्रामपंचायत सरपंच अशोक धुमाळ यांनी असाक्षर मुक्त गावाची/साक्षरता शपथ याबाबत प्रतिज्ञा दिली. यावेळी विद्यार्थ्यांचे कवायत देशभक्ती गीतांच्या तालावर घेण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिना वाघ यांनी केले. आभार संतोष बिऱ्हाडे यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी सुनील मोगल, संतोष बिऱ्हाडे,अंबादास बनसोडे, रमेश वडघुले ,प्रफुल्ल देवरे, निलेश शिंदे, रूपाली मते, मिना वाघ,वैशाली गवळी, शितल देवरे, कैलास भगत, किशोर निफाडे आदींनी प्रयत्न केले.

# ३ हजार ९४ युवकांना कौशल्यासह थेट नोकरीचीही मिळाली संधी

## नागपूर जिल्ह्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ठरली प्रेरणादायी

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** 'एमसीए' पदवीधर असलेला प्रथमेश पांढरे हा तरुण विविध सॉफ्टवेअर कंपन्यांमध्ये संधीच्या शोधात होता. गेल्या वर्षी त्याने राज्य सरकारच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत अर्ज केल्यावर त्याला आय.टी. पार्कमधील लाईटहाऊस इन्फोसिस्टीम प्रा. लि. या कंपनीत प्रशिक्षणाची संधी मिळाली. सोबतच त्याला शासकीय योजनेचे १० हजार रुपये विद्यावेतनही मिळू लागले. सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीत प्रथमेशला केवळ आयटी कंपनीतील प्रत्यक्ष कामाचा अनुभवच मिळाला नाही, तर या माध्यमातून त्याची विविध कौशल्येही विकसित होण्यात मदत झाली. आज प्रथमेश त्याच कंपनीत 'सॉफ्टवेअर डेव्हलपर' पदावर कार्यरत आहे. प्रथमेशसह अशा असंख्य तरुणांचा हा प्रवास इतर तरुणांसाठी सध्या प्रेरणादायी ठरतो आहे.

सुशिक्षित बेरोजगार तरुणांना ११ महिन्यांच्या कालावधीसाठी शासकीय आणि खासगी क्षेत्रातील विविध आस्थापनांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव देऊन त्यांची कौशल्य क्षमता वाढविणे आणि त्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने राज्य सरकारकडून मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्यात आली. या प्रशिक्षणार्थींना राज्य शासनाच्या वतीने त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार विद्यावेतनाचे आर्थिक लाभही देण्यात आले. यामुळे या तरुण-तरुणींना नोकऱ्यांच्या क्षेत्रात 'एक्स्पोझर' मिळण्याच्या दृष्टीने मोठी मदत झाली आहे.

प्रशिक्षण कालावधित उत्तम कामगिरी करणाऱ्या नागपुरातील अनेकांना खासगी कंपन्यांनी प्रत्यक्ष नोकरीची संधी दिल्याची असंख्य उदाहरणे आहेत. प्रथमेशप्रमाणेच जयंत शर्मा, बादल हिंगणीकर यांच्यासह अनेक तरुण-तरुणींनाही याच कंपनीत प्रशिक्षण घेतल्यावर सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणून नागपुरात संधी मिळाली आहे.

"नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना पहिली संधी मिळणं अत्यंत आवश्यक ठरतं. ती संधी या योजनेतून मिळाली," असे ते सांगतात. "प्रशिक्षणाच्या कालावधित कंपनीत विविध कौशल्ये विकसित होण्यातही मदत झाली. अगदी लाईव्ह प्रोजेक्टवर काम करण्याची संधी आम्हाला मिळाली," अशी माहिती त्यांनी दिली.

सध्या मॅक्स ॲलेक्सिस हॉस्पिटलमध्ये एचआर विभागात कार्यरत असलेला अयान अन्सारी, सॅम्यूअल सरोदे तसेच प्रशासन विभागातील श्वेता खरे या प्रशिक्षणार्थींनाही या योजनेचा मोठा लाभ झाला. अयान सांगतो, "नोकरीच्या दृष्टीने आम्ही अगदीच नवखे होतो. मला जवळजवळ वर्षभर हॉस्पिटलच्या एचआर विभागात शिकण्याची संधी मिळाली. सध्या तेथेच रूजू झालो आहे. हा अनुभव मला इतरत्रही कामी येऊ शकतो." सॅम्युअल आणि श्वेता यांचीही काहीशी अशीच प्रतिक्रिया आहे.

राखी मन्ना, निकिता पुणेकर आणि वर्षा झा या पदवीधर तरुणीही आता प्रोव्हिन्शियल लाईफस्टाईल रिटेल सर्व्हिसेसच्या माध्यमातून टाटा कंपनीच्या तनिष्क ज्वेलरी शोरूममध्ये विविध पदांवर रूजू झाल्या आहेत. "अकरा महिन्यांच्या प्रशिक्षणात आमच्या क्षेत्राशी संबंधित बरंच काही शिकायला मिळालं," असं त्या सांगतात. वर्षा झा ही तरुणी याच कंपनीत याच योजनेत प्रशिक्षित होऊन एचआर असिस्टंट या पदावर रूजू झाली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून संधी मिळालेला अनुज गुडे आणि श्रीराम नागपूरकर हे दोघे पदवीधर आता शिक्षक सहकारी बँकेत अनुक्रमे आयटी आणि लेखा विभागात कार्यरत आहेत. "योजनेच्या माध्यमातून बँकेत प्रशिक्षणाची संधी मिळाल्यावर बँकेने आमचं काम पाहून आम्हाला रूजू करुन घेतलं," असे दोघांनी सांगितले. लाईटहाऊस इन्फोसिस्टीम प्रा. लि. या कंपनीने अशा तब्बल १८ प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष नोकरीची ऑफर देऊन रूजू करून घेतले आहे. "आयटीच्या क्षेत्रात प्रशिक्षित उमेदवारांना संधी मिळतेच. त्यांच्या विद्यावेतनाचा आर्थिक भार शासनानं घेतला होता. त्यामुळे ही योजना आमच्यासाठीही उपयुक्त ठरली. आम्हाला उमेदवारांची क्षमता, कौशल्ये जाणून घेतला आली," अशी माहिती कंपनीच्या एचआर विभागाचे अधिकारी अभिषेक मेश्राम यांनी दिली. विशेष म्हणजे अशा आणखी १८ उमेदवार कंपनीत सध्या प्रशिक्षण घेत आहे.

"या योजनेच्या माध्यमातून आम्हाला आमच्याकडे प्रशिक्षित झालेले उमेदवार आयतेच उपलब्ध झाले," असे मत प्रोव्हिन्शियल लाईफस्टाईल रिटेल सर्व्हिसेसच्या संजीवनी कातंगळे यांनी व्यक्त केले. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या माध्यमातून नागपूर जिल्ह्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत सुमारे ३ हजार ९४ उमेदवारांना विविध शासकीय व खासगी आस्थापनांमध्ये अशा स्वरुपाच्या प्रशिक्षणाची संधी मिळाली होती. यापैकी ४४ प्रशिक्षणार्थींना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे प्रशिक्षणाच्या ठिकाणीच नोकरी उपलब्ध झाली असल्याची माहिती विभागाच्या सहायक आयुक्त श्रीमती सुनंदा बजाज यांनी दिली. उर्वरित सुमारे 3 हजारांवर प्रशिक्षणार्थी आता अनुभवी उमेदवार म्हणून इतरत्र रोजगारासाठी सक्षम झाले आहेत, असे त्यांनी सांगितले.

---

## कै. गोविंदराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड: प्रतिनिधी /सय्यद इसा :** शेख फरीद वझरा या गावात प्रजासत्ताक दिनानिमित्ताने सर्व गावातून विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढून ग्रामपंचायत कार्यालय जिल्हा परिषद शाळा व कै. गोंविदराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव माननीय देवराव पाटील पांडागळे साहेब व त्यांच्या सौभाग्यवती स्मिताताई यादेखील उपस्थित होत्या सर्वप्रथम कार्यक्रमा चे प्रस्ताविक साईनाथ नागरगोजे सर यांनी केले विद्यार्थ्यांची भाषणे झाली त्यामध्ये कुमारी पंकजा मुंडे ,पायल पवार, आयुष पाटील ,दुर्गा शेंडे ,वैष्णवी फड, कृष्णा जगदाळे ,पूनम केंद्रे, नगमा सय्यद, कनिष्का मुंडे, रोशनी आडे ,स्वप्निल ठाकरे ,श्रावणी जाधव, मेगा फड ,संजीवनी ,आयान शेख यांची भाषणे झाली या कार्यक्रमाच्या शेवटी एडवोकेट माननीय देवरावजी पंडागळे साहेब यांनी आपले विचार



मांडले त्यानंतर प्राचार्य संजय फडसर यांनी देखील आपले मत मांडले या कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवराच्या हस्ते प्रमानपत्र देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन मुनेश्वर सर यांनी केले तर सुरेख असे सूत्रसंचालन समीक्षा जगदाळे यांनी केले या कार्यक्रमाला गावातील सरपंच दीपक केंद्रे, सय्यद ईसा सर (पत्रकार) ,व गावातील प्रतिष्ठित नागरिक शिक्षक, शिक्षक तर कर्मचारी, विद्यार्थी ,विद्यार्थिनी उपस्थित होते.

---

## पंचशीलच्या पालनातूनच आपला मेंदू निरोगी ठेवू शकतो - प्रसिद्ध निरोफिजिशियन डॉक्टर संजय रामटेके

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक :** दि स्कूल ऑफ नोबल थॉट तर्फे आज दिनांक 25 जानेवारी 2026 रविवारला व्याख्यान आयोजित केले होते.या व्याख्यानाचे प्रमुख मार्गदर्शक प्रसिद्ध वरिष्ठ न्यूरोफिजिशियन डॉक्टर संजय रामटेके हे होते.त्यांचा विषय होता" मेंदू विकार जसे ,ब्रेन स्ट्रोक ,एपिलेप्सी, अलमा यझर,डिमनेशिया,मिरगी,मा यग्रेन इत्यादी--चिकित्सा व उपाय"या विषयावर बोलताना त्यांनी हे विकार का होतात याचे वैज्ञानिक विश्लेषण सादर केले.आपल्या जीवन जगण्याची लाइफस्टाईलच या मेंदू विकारांना जन्म देत असते असे मत त्यांनी नोंदविले.या संपूर्ण रोगापासून बचाव करून आपला मेंदू ठणठणीत ठेवायचा असेल तर ज्या न्यूरांनपेशीपासून मेंदू बनलेला असतो त्या न्यूरॉन पेशींची संख्या कमी होणार नाही याची आपण काळजी घेतली पाहिजे असे ते म्हणाले.कारण कारण एकदा न्यूरान पेशींची संख्या कमी झाली की ती मेंदूला कमजोर बनवते व ही न्यूरानची संख्या आपल्याला भरून काढता येत नाही असे ते म्हणाले




.तथागतांनी अडीच हजार वर्षांपूर्वी आपले मन म्हणजेच मेंदू निरोगी ठेवण्यासाठी उपाय दिलेला आहे तो उपाय म्हणजे पंचशीलाचे काटेकोर पालन करणे हा होय असे मत त्यांनी नोंदविले.श्रोत्यांमधून मेंदूच्या विकारासंबंधीअनेक प्रश्न आणि शंका उपस्थित करण्यात आल्या त्या सगळ्या शंकांचे निरसन आपल्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनातून त्यांनी केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध मेडिसिन तज्ञ, औषधी शास्त्र विभाग एम्स येथे कार्यरत असणारे डॉक्टर अमोल दुबे सर होते.त्यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणातून डॉक्टर रामटेके सरांनी एवढा किचकट विषय अत्यंत सोप्या आणि मनोवेधक पद्धतीने सादर केला याबाबत त्यांची प्रशंसा केली. दी स्कूल ऑफ नोबल थॉटच्या उपक्रमाबद्दलची माहिती संस्थेचे संचालक डॉक्टर एन व्ही ढोके यांनी सादर केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आयुष्यमान बापू खोब्रागडे यांनी केले. कार्यक्रमाचे सुंदर संचालन आयुष्यमान दीपक रत्नपारखी यांनी केले.कार्यक्रमाला वसाहती मधील सर्व जाती धर्मांच्या गणमान्य नागरिकांची भरघोस उपस्थित होती.

---

## रजनीकांत बोरेले यांचे हस्ते कार्तिक स्टील डोअर्स व इंटेरिअर्स चा उद्धघाटन संपन्न - गौरव झोडे

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/ पांढरकवडा :** येथील रजनीकांत डालूरामजी बोरेले,प्रख्यात व्हिसल ब्लोअर आणि अपक्ष संचालक कृ.उ. बा.समिती पांढरकवडा यांच्या हस्ते कार्तिक स्टील डोअर्स व इंटेरिअर्स दुकानाचे उद्धघाटन वैदिक मंत्रो उच्चार करुण रजनीकांत बोरेले यांनी उद्घाटन फित कापली.कार्तिक स्टील डोअर्स व इंटेरिअर्स दुकानाचा उदघाटन समारोह मोठ्या उत्साहात संपन्न झाला आहे.



उद्धघाटन समारोह पूर्वी मान्यवर रजनीकांत बोरेले,यांचा शाल,नारळ आणि पुष्पगुच्छ देवून गौरव झोडे यांनी सत्कार केला.तर यशवंत काळे,निवृत्त व्यवस्थापक पोष्ट ऑफिस पांढरकवड़ा आणि संजय शेवाळकर नागपुर या मान्यवरांचा सुद्धा शाल व श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.कार्तिक स्टील डोअर्स व इंटेरिअर्स दुकानाचे शुभारंभ उद्धघाटन समारोहाच्या वेळी प्रतिष्ठित व्यापारी गणेश ओम प्रकाश सिंघानिया,शुभंम लक्ष्मीकांत बोरेले, नंद किशोर झोडे,सर्वम रजनीकांत बोरेले,सौ.वंदना झोडे यांच्या सह निमंत्रित,महिलांची आणि पुरुषांची मोठ्या संख्यात उपस्थिती लाभली होती.सर्व निमंत्रित,प्रमुख पाहुने आणि नंदकिशोर झोडे यांचे सर्व नातेवाईक यांची बसन्याची व अलपोहारची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.कार्तिक स्टील डोअर्स व इंटेरिअर्स चा भव्य शुभारंभ महिला समाज शाळा,भगतसिंग चौक जवळ झाला आहे.अतिशय सुरक्षित स्टील दार शेंसर लॉक सौंदर्य,सह अनेक प्रकारची दार आणि इंटेरिअर्स उपलब्ध व्हावे हा उदिष्ट गौरव झोडे यांचा आहे हे विशेष रजनीकांत बोरेले सह सर्व मान्यवर शुभारंभ करीता आलेत त्या बद्दल झोडे कुटुंब तर्फे आभार व्यक्त केले.

---

## पर्जन्ययाग संयोजन समिती, पनवेल यांच्या वतीने तीन दिवसीय 'श्री देवी पंचायतन याग'

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पर्जन्ययाग संयोजन समिती, पनवेल यांच्या वतीने तीन दिवसीय 'श्री देवी पंचायतन याग' मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यंदाचे ११ वे वर्ष असलेल्या या कार्यक्रमात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन बल्लाळेश्वर मंदिर येथे करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी ब्रह्मकूर्च, गोपूजन, प्रधान संकल्प, गणेश पूजन, पुण्याहवाचन, देवता स्थापन, आरती, मंत्रपुष्प कार्यक्रम संपन्न झाले. तर दुसऱ्या दिवशी देवता पूजन, अग्निस्थापन, ग्रह-वास्तू हवन, मुख्य देवता हवन, दिपोत्सव, आरती, अष्टावधान सेवा कार्यक्रम संपन्न झाले. तर तिसऱ्या दिवशी देवता पूजन, मुख्य देवता हवन प्रायश्चित हवन,



बलिदा आणि पूर्णाहुती असे विविध कार्यक्रम झाले. यावेळी करंदीकर गुरुजी, हेमंत जोशी, प्रसाद कर्वे `यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. जागतिक शांतता लाभावी, देशभरात पाऊस आवश्यकतेप्रमाणे पडावा, देशाची भरभराटी व्हावी या उद्देशाने या पर्जन्ययागचे आयोजन करण्यात आल्याची माहिती करंदीकर गुरुजी यांनी दिली.

---

## हणेगाव येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी महादेव उप्पे :** देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या गणराज्य दिनी गावामध्ये'प्रजासत्ताक दिन चिरायू होवो','संविधानाचा जयजयकार',च्या घोषणा देत विद्यार्थी व शिक्षक बंधू भगिनीकडून प्रभातफेरीकाढण्यात आली. त्यानंतर सकाळी ०८ वाजून०५ मिनिटानी शाळेचे मुख्याध्यापक गालचेलवार सर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करून पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.यावेळी इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेमध्ये कॉपीमुक्त अभियान राबवण्याकरिता समस्त गावकरी विद्यार्थी पालक यांच्याकडून कॉपीमुक्तीची शपथ घेण्यात आली.त्यानंतर २६ जानेवारी निमित्त घेण्यात आलेल्या खेळामध्ये तसेच विविध स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर कवायत संचलन तसेच लेझीम प्रकाराचे सुंदर असे




देखावे आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,संविधानाची मूल्ये याविषयी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट भाषण सुद्धा सादर केले.या कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतील विद्यार्थी तसेच उपस्थित सर्व नागरिकांना चहापान करून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.यावेळी हणेगाव ग्रामपंचायतीचे मा.सरपंच,उपसरपंच सर्व सदस्य ग्रामविकास अधिकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,सर्व सदस्य तसेच जेष्ठ नागरिक,अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि शालेय विद्यार्थी,शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तर हणेगाव येथील स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे देशभक्ती गीतावर लेझीम सादर करण्यात आले तर देश रंगीला गीतावर नृत्य सादर करण्यात आले.

---

## वाघमाय देवी संस्थान यात्रा व महाप्रसाद महोत्सव

**दैनिक युवक आधार**

**मानोरा तालुका प्रतिनिधी/नितीन अढाव :** तालुक्यातील रुई येथे श्री क्षेत्र वाघामाय देवी संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे भव्य यात्रा व महाप्रसादाचे आयोजन केले



आहे रुई येथे नामांकित व प्रसिद्ध संस्थान मानले जाणारे वाघामाय देवी हे अत्यंत प्राचीन मंदिर आहे व तेथे मोठ्या प्रमाणात भाविक-भक्तांची, नागरिकांची गर्दी सुरू राहते. यात्रेचें नियोजन जागा वाटप सुरु झाले आहे तरी व्यापारी वर्गानी आपली जागा निश्चित करावी तसेच महाप्रसाद आणि नाडे गाडे ओढणे एक तारखेला रविवार आयोजित करण्यात आला आहे तरी मंगळवारी रात्री ला विदर्भ स्तरीय खंजेरीभजन स्पर्धा देखील होणार आहे तरी महोत्सव रविवार ते मंगळवार पर्यंत होणार आहे तरी सर्व भक्त-भाविक मंडळी यांनी महाप्रसादाला उपस्थित रहावे असे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे.

---

## मातोश्री विद्यालय महागाव येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**एम.डी. सुरोशे महागाव यवतमाळ :** २६ जानेवारी २०२६ मातोश्री विद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून रावसाहेब नरवाडे तर प्रमुख पाहुणे म्हणूण राजेंद्र रानडे शरदचंद्र मामिडवार विद्यालयाचे प्राचार्य अनुताई गावंडे आदिच्या उपस्थितीत ध्वजारोह संपन्न झाले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यालयामध्ये संविधान उद्देशिका वाचन व देशभक्तीपर नारे




गीत गायन त्याचबरोबर देशभक्तीपर गीतवर नृत्य, सामूहिक कवायत लोकनाट्य, पथनाट्य इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले मी संविधान बोलतो' हे पथनाट्य उच्च माध्यमिक च्या मुलींनी अतिशय उत्कृष्टपणे सादर करून विविधता मे एकता भारत की विशेषता हे संविधानाचे भाकीत उतरून कार्यक्रमात सर्वांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी कार्यक्रमात विद्यालयातील राज्यस्तरीय डॉजबॉल खेळाडूंचे कौतुक करून सत्कार करण्यात आला. साक्षरता अभियान या कार्यक्रमांतर्गत गणराज्यदिनी देश साक्षर करण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांच्या खाऊ वाटपाणे झाली.

# मेंडका येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी : प्रकाश गवारे :** मेंडका येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. २६ जानेवारी २०२६ रोजी इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय, मेंडका येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने बक्षिसांचे वितरण करण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण तुळशीराम चुक्केवाड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन राष्ट्रगीत गायन करण्यात आले.

या कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी, शंकर पामलवाड सर, सेवा निवृत्त मुख्याध्यापक रामेश्वर बोदमवाड सर,सरपंच लक्ष्मणराव ईजळकर, उपसरपंच नारायण निखाते,पोलिस पाटील गोविंद वसुरे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष प्रशांत निखाते, उत्तम जनजावळे,माजी सरपंच गंगाधर दासरे, माधव वसुरे,रवि निखाते, कैलास कोरेबैनवाड,डिगांबर आम्रतवाड, प्रेम निखाते,मुंबई पोलीस ज्ञानेश्वर जंगीलवाड,व्यंकटी आक्कमवाड, नामदेव आडबे, गौतम हाटकर,रामा बारतोंडे,शिक्षकवर्ग तसेच ग्रामस्थ



मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढली. प्रभातफेरीनंतर जि. प. प्राथमिक शाळा, नवीन मेंडका (वस्ती शाळा) अध्यक्ष रवि निखाते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. प्रभातफेरीदरम्यान जि.प.प्राथमिक शाळा येथिल विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस आदी महापुरुषांच्या वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

जि. प. प्राथमिक शाळा, मेंडका येथे शालेय शिक्षण समिती अध्यक्ष रामेश्वर कोरेबेंनवाड व उपाध्यक्ष प्रशांत निखाते यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. राष्ट्रगीतानंतर भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

तसेच होळी मैदान, सोसायटी परिसर येथे सोसायटी अध्यक्ष व्यंकटी आक्कमवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. सम्राट अशोका बुद्ध विहार, भीम नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून राष्ट्रगीत व संविधान प्रस्तावनेचे वाचन करण्यात आले. यावेळी काही विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या जीवनकार्य व विचारांवर भाषणे करून उपस्थितांना प्रेरित केले.

ग्रामपंचायत कार्यालय, मेंडका येथील झेंडा वंदन सरपंच लक्ष्मणराव ईजळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.व ग्रामपंचायत रोजगार सेवक रामराव वडजे यांनी आरोग्य विषयक योजना व कुष्ठरोग याविषयी जनजागृती केली. यानंतर जि. प. प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझीम प्रदर्शनाने ग्रामस्थांची विशेष दाद मिळवली.अंगणवाडी केंद्र क्रमांक १,२,३, सर्व शिक्षीका विद्यार्थी व अंगणवाडी सेविका व तसेच लहान चुमुकले विद्यार्थी यांना खाऊ वाटप करण्यात आला आहे.मेंडका येथील जेष्ठ नागरिक, विद्यार्थी पालक,सामाजिक कार्यकर्ते, महीला, विविध क्षेत्रातील शासकीय -निमशासकीय, विविध पक्षांचे कार्यकर्ते नेते सर्व ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

मात्र, या कार्यक्रमादरम्यान ग्रामस्थांनी मागील चार ते पाच वर्षांपासून एकही ग्रामसभा न झाल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

ग्रामस्थांच्या मूलभूत समस्या मांडण्यासाठी ग्रामसभा होत नसल्याने जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

एकीकडे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले जात असताना, दुसरीकडे ग्रामसभा न होणे ही लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने चिंतेची बाब असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

## चाईल्ड प्रायमरी स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**केज प्रतिनिधी :** चाईल्ड प्रायमरी स्कूल येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेच्या पालकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत गायन करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सकाळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी प्रभात फेरी काढून परिसरात देशभक्तीचा संदेश दिला.या कार्यक्रमास शाळेचे शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले

# निष्क्रिय प्रशासन किती शेतकऱ्याचे बळी घेणार ?; शेतात सुरू असलेल्या उपोषणाचा उजाडला तिसरा दिवस

- प्रजासत्ताक दिनापासून सुरू केले शेतकऱ्यांनी उपोषण
- कृत्रिम अडथळे दूर करण्यास प्रशासन अपयशी

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी उमेश साखरकर :** तालुक्यातील डोळंबा ते वडगाव या पांदण रस्त्याचे काम सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून येथील स्थानिक शेतकऱ्यांच्या वतीने केली जात आहे. हे काम सध्या जिल्हा नियोजन व मनरेगा अंतर्गत मंजूर असून या रस्त्यावरील काम तात्काळ सुरु करावे, अशी मागणी शेतकरी संजय राऊत यांनी केली होती. अन्यथा दि. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनापासून आमरण उपोषण करून आत्मदहन करणार असल्याचे निवेदन त्यांनी प्रशासनाला दिले होते.

निवेदन देताच संबंधित यंत्रणेकडून तात्काळ भूमिपूजन करून रस्त्याचे काम सुरू करण्यात आले. सदर रस्त्यावर




मातीकाम करून दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी शेतकरी दिनापासून हे काम पुन्हा बंद करण्यात आले. या रस्त्यावरील कृत्रिम अडथळे दूर करण्यास प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप स्थानिक शेतकरी संजय राऊत यांनी केला आहे. गेल्या अनेक वर्षांनंतर रस्त्याचे अर्धवट काम करून रस्ता बंद केल्या जाते. संबंधित यंत्रणेने हे काम पूर्णत्वास न्यावे, हा रस्ता दोन गावांना जोडणारा असल्याने रस्त्याचे काम झाल्यास शेतकऱ्यांना हा रस्ता वरदानच ठरणार आहे.

# रायगडमधील रोहा तालुक्यात विधवा महिलेचा विनयभंग; मंत्री आदिती तटकऱ्यांच्या जिल्ह्यातच असुरक्षितता उघड

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** महिलांच्या सुरक्षितता व सन्मानाच्या मोठमोठ्या घोषणा दिल्या जात असताना प्रत्यक्षात मात्र ग्रामीण भागातही महिलांवर अत्याचाराच्या घटना थांबत नसल्याचे पुन्हा एकदा भयावह चित्र रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यात घडलेल्या संतापजनक घटनेतून समोर आले आहे. महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्या स्वतःच्या तालुका व जिल्ह्यातच महिलांची असुरक्षितता अधोरेखित करणारी ही घटना घडली. रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत २२ जानेवारी रोजी सायंकाळी साडेचार वाजता विधवा महिलेचा विनयभंग करण्यात आला असून, आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे.रोहा तालुक्यातील




एका गावाजवळील रानात घरगुटी वापरासाठी लाकूड गोळा करण्यासाठी गेलेल्या या विधवा महिलेला आरोपीने एकटी असल्याची संधी साधून विनयभंग केला. पीडित महिलेचे वय ४० च्या आसपास असल्याचे सांगितले जाते. ती रानात लाकडी फाटे गोळा करत असताना आरोपी तिच्याजवळ आला आणि अचानक तिचा हात पकडून, "तुझा नवरा मेला आहे, मग तुझं काय काय?" असे अत्यंत नीच, अपमानास्पद व आक्षेपार्ह वाक्य उच्चारले.एवढ्यावर थांबला नाही, तर आरोपीने महिलेला जबरदस्तीने जवळ ओढले आणि तिच्या स्त्रीसन्मानाला धक्का देणारे कृत्य केले. या घटनेमुळे पीडित महिला प्रचंड घाबरून गेली असून, तिला गंभीर मानसिक धक्का बसला आहे. घटनेच्या लगेच नंतर तिने धैर्य दाखवत रोहा पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि तक्रार नोंदवली. त्यानुसार रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १७/२०२६ दाखल करण्यात आला असून, आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ७४ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा तपास महिला पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. आरोपीचा शोध घेत असून, लवकरच त्याला अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलीसांनी दिली.

या घटनेमुळे संपूर्ण रोहा तालुका व रायगड जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. "महिला व बाल विकास मंत्री असलेल्या जिल्ह्यातच महिलांवर अत्याचार होत असतील, तर सामान्य महिलांनी सुरक्षिततेची अपेक्षा तरी कुणाकडून करावी?" असा सवाल ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते व महिला संघटनांकडून उपस्थित केला जात आहे. ग्रामीण भागात जळणाचे लाकूड गोळा करणे, शेतात काम करणे, मजुरीसाठी बाहेर पडणे ही महिलांची दैनंदिन गरज असते. मात्र, अशा वेळीही त्यांच्या सन्मानावर घाला घालण्याच्या घटनांमुळे समाज म्हणून आपण कुठे अपयशी ठरत आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे, अशी खेदपूर्ण प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# जासई विद्यालयात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि बा पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई, तालुका उरण जिल्हा रायगड या विद्यालयात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या महापुरुषांच्या प्रतिमेस सन्माननीय पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केले. त्यानंतर विद्यालयाच्या प्राचार्य माननीय सौ म्हात्रे के जी मॅडम य यांच्या हस्ते ध्वजारोहण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी व पाहुण्यांनी राष्ट्रध्वज सलामी देऊनराष्ट्रीय गीत,ध्वजगीत महाराष्ट्र गीत साक्षरतेची प्रतिज्ञा व इतर कार्यक्रम झाले. त्याचबरोबर संगीत तालावर विद्यार्थ्यांची कवायत घेतली गेली .तसेच विद्यालयातील आर एस पी कथक व स्काऊट गाईड पथक यांनी ध्वजास मानवंदना देऊन सलामी दिली. तसेच या शैक्षणिक वर्षात विद्यालयास विविध देणगीरदारांनी वस्तू रुपात व आर्थिक रुपात जी



मदत केली त्या सर्व थोर देणगीदारांचे विद्यालयाच्या वतीने माननीय मुख्याध्यापिका म्हात्रे मॅडम यांनी आभार व्यक्त केले. शेवटी विद्यार्थ्यांना गोड चॉकलेटचे वाटप करून उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गाताडी सर व घरत एम के मॅडम यांनी केले.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा योजनेत तालुकास्तरीय मूल्यांकनावर आक्षेप

## बाळापूरच्या शालेय समितीकडून पुनर्मूल्यांकनाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी/गिरमाजी सुर्यकार :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" या योजनेअंतर्गत झालेल्या तालुकास्तरीय मूल्यांकन प्रक्रियेवर बाळापूर तालुक्यातील शालेय व्यवस्थापन समितीने तीव्र आक्षेप नोंदवला असून, सदर मूल्यांकनाची फेरतपासणी व पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी अधिकृतरीत्या करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत शाळांची स्वच्छता, पायाभूत सुविधा, शैक्षणिक वातावरण, विद्यार्थ्यांची उपस्थिती, उपक्रमांची अंमलबजावणी आदी निकषांवर गुणांकन करण्यात आले. मात्र, बाळापूर तालुक्यातील अनेक शाळांचे मूल्यांकन घाईघाईत, अपुरे व वस्तुनिष्ठ न झाल्याचा आरोप शालेय व्यवस्थापन समितीने केला आहे.

समितीच्या म्हणण्यानुसार, काही शाळांना प्रत्यक्ष कामकाज व उपलब्ध सुविधांच्या तुलनेत अत्यल्प गुण देण्यात आले, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी न करता कागदोपत्रीच गुणांकन झाल्याची शंका आहे. त्यामुळे अनेक गुणवत्तापूर्ण शाळांवर अन्याय झाला असून, योजनेचा मूळ उद्देशच धोक्यात येत असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

यासंदर्भात शालेय व्यवस्थापन समिती, बाळापूरच्या वतीने तालुका शिक्षण अधिकारी व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर करून फेरमूल्यांकन करण्याची मागणी करण्यात आली आहे. मूल्यांकन प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व प्रत्यक्ष पाहणीवर आधारित असावी, अशी स्पष्ट मागणी समितीने केली आहे.

"या योजनेमुळे शाळांच्या विकासाला चालना मिळावी हा सरकारचा हेतू स्तुत्य आहे. मात्र, मूल्यांकनच चुकीचे झाले तर चांगल्या शाळांचे नुकसान होईल आणि शिक्षकांचा उत्साह खचेल," असे मत




काही मुख्याध्यापक व समिती सदस्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, प्रशासनाने या तक्रारींची दखल घेत पुनरावलोकन समिती नेमण्याचा विचार सुरू असल्याचे संकेत दिले असून, आवश्यक असल्यास काही शाळांचे पुनर्मूल्यांकन करण्यात येईल, असे अनौपचारिकरीत्या सांगण्यात येत आहे.

# मुल्हेर येथे विविध कार्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त भारतीय तिरंगा ध्वज सन्मानाने फडकला

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी /दीपक गायकवाड/बागलाण :** सकाळी प्रजासत्ताक दिना निमित्त आदिवासी मुलांचे वस्तीगृह,जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय , जि. प. प्राथमिक शाळा यांनी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी जनता विद्यालय पासून प्रभात फेरीस सुरुवात झाली.शाळेतील ,विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कर्मचारी ग्रामपंचायत आवारात एकत्र जमत गावाचे प्रथम नागरिक सरपंच निंबा भाणसे यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकवून, राष्ट्रगीत, ध्वज गीत व साक्षरता शपथ घेऊन लोकशाहीचा आनंद उत्सव व ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. त्यानंतर ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले ग्रामसभेत जल जीवन मिशन व गावातील अंडरग्राउंड गटारी, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन साठी प्रशासनाने जागो जागी कुंड्या, ओला कचरा, सुखा कचरा साठी डस्टबिन ठेवणे, प्रत्येक घराला समान पाणी वितरण व प्लास्टिक बंदी, गाव




नियंत्रण समिती, पाणी वितरण समिती गठित करण्यात येऊन ठराव करण्यात आलेत ग्रामस्थांना,नागरिकांना सुविधा देणेचे प्रामुख्याने विचार करून विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी गावातील सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ, पोलीस हवलदार शरद भगरे, पोलीस शिपाई पुरुषोत्तम बारगळ व योगेश साळुंखे तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

श्री उद्धवेश कृषी सेवा केंद्र जामोटी येथे ह भ प भक्तराज महाराज यांच्या हस्ते भारतीय ध्वज तिरंगा फडकवण्यात येऊन संचालक केदा अहिरे व घोटकर एसपी याच्याकडून आलेल्या मान्यवरांना अल्पोउपहाराचे वितरण करण्यात आले तसेच डॉ.मनोज क्षीरसागर यांच्या समर्थ हॉस्पिटल येथे भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

**मुख्यालयी राहत असलेल्या शिक्षकांचा सत्कार...**

जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथील प्राचार्य श्री. एस.सी.धात्रक व पर्यवेक्षक पी.आय. शेख यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन गौरवण्यात आले. तसेच अप डाउन करणाऱ्या शिक्षकांना मुख्यालय राहण्याची सूचना वजा इशारा यावेळी देण्यात आला.

# भोकर येथील सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी / माधव काईतवाड बोरगडीकर / हिमायतनगर :** तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अनेक रस्ते बोगस करण्यात आले आहेत. या बोगस कामांविषयी अनेक तक्रारी आल्या. परंतु हिमायतनगर सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंते यांचा मनमानी करभार चालू आहे. तालुक्यात चांगले रस्ते व्हावी अशी नागरीकांची इच्छा आहे. पण अभियंत्यांनी केवळ आपल भलं कसं करता येईल याकडेच त्यांच लक्ष आहे.

तालुक्यातील नुकताच बोरगडी ते धानोरा रस्त्याचे डांबरीकरणाचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. या रस्त्याची गुणनियंत्रण विभागाकडून सखोल चौकशी करून लेखा परिक्षण अहवाल देण्यात यावा अशी मागणी केली होती. पण सार्वजनिक बांधकाम विभागाने ती तक्रार कचराकुंडीत टाकून दिल्याने आज दि. २७ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय भोकर येथे तक्रारदार माधव काईतवाड, विजय वाठोरे, गंगाधर गायकवाड, दाऊ गाडगेवाड यांनी आमरण उपोषणास सुरूवात केली आहे.

यावेळी हिमायतनगर तालुक्यातील जिल्हा सिमा वारंगटाकळी-धानोरा-बोरगडी-हिमायतनगर- टेंभी-आंदेगाव-वाळकेवाडी-दुधड- या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरण तसेच दुरूस्तीचे गुणनियंत्रणामार्फत समिती गठीत करून तक्रारदारासमोर तपासणी करण्यात यावी. तसेच सदरील कामाचे लेखा परिक्षण अहवाल देण्यात यावा. दोषी अभियंत्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे यासाठी आमरण उपोषण सुरू केले आहे.

# प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा शहरातील प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये दिनांक २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर व सारिका ताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा शहरात प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये मुख्याध्यापक मोरे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे आजीनाथराव नागरगोजे, श्रीकांत लांडगे, श्री.घालमिले यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या वेळी शाळेतील सर्व शिक्षक कर्मचारी तथा विद्यार्थी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत गायन, महाराष्ट्र गीत गायन व संविधानाचे व प्रतिज्ञा पठण करण्यात आले. त्या नंतर पाटोदा शहरातून विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी महामानव वेशभूषा व संगीत वाद्य या सह सहभाग नोंदवला छोट्या मुलानी वाजलेले संगीत वाद्य शहरातील नागरिकांचे आकर्षण ठरले. फेरीनंतर विद्यार्थ्यांची संगीत कवायत तसेच विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन कार्यक्रम वक्तृत्व यांचे आयोजन करण्यात आले. या वेळी वेगवेगळ्या देशभक्तीपर गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य करून आपली कला सादर केली. स्वातंत्र्याचा इतिहास आपल्या भाषणातून व्यक्त केला. मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी इंग्रजीमध्ये केलेल्या भाषणांचे कौतुक आलेल्या सर्व पालकांनी केले. चिमुकल्यांचा हा कार्यक्रम पाहण्यासाठी शाळेतील सर्व पालक तथा परिसरातील नागरिक



उपस्थित होते. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वीर मॅडम यांनी केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मोरे सर हे होते व आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत श्रीमती शेलार मॅडम यांनी केले कार्यक्रमाची सुरुवात हे ईश्वरा सर्वांना चांगली बुद्धी दे आरोग्य दे या प्रार्थनेने करण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये पाटोदा शहरात घेण्यात आलेल्या पीटीएनटीएस परीक्षेमध्ये शाळेतून प्रथम क्रमांक मिळवलेली इ.४ थी ची विद्यार्थिनी कु.धनश्री नागरगोजे हिचा सर्व पालकांसह प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तर कार्यक्रमाचा शेवट पसायदानाने करण्यात आला व आभार माताडे सर यांनी मानले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती गायके मॅडम यांनी सहकार्य केले. या वेळी शाळेतील पालक गणेश राऊत, अनंता राख, दत्तात्रेय दुधवडे, सचिन खाडे, योगेश टेकाळे, नाईकनवरे, शेख अझरूद्दीन, सय्यद इम्रान, गोपाळराव तारळकर, श्री.सानप, अनिल वाघमारे यांच्या सह श्रीमती चापकानडे ताई, श्रीमती गांगुर्डे ताई, श्रीमती वाघमारे ताई, श्रीमती अडागळे ताई, श्रीमती जेधे ताई, सय्यद भाभी, शेख भाभी, श्रीमती मडावी ताई, श्रीमती केदार ताई, श्रीमती शिंदे ताई यांच्या सह सर्व पालकांची व परिसरातील पुरुष महिलांना नागरिकांची उपस्थिती होती.



**नांदाई माता मच्छिमार सहकारी संस्था कोंबडभुजे आणि राधा राम मच्छिमार सहकारी संस्था खारकोपर या मच्छिमारांच्या संघटनेने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमधील गव्हाण जिल्हा परिषद आणि गव्हाण व वहाळ पंचायत समितीच्या भाजप महायुतीच्या उमेदवारांना आपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. या संदर्भातील पाठिंबा पत्र नांदाई माता मच्छिमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष सतीश रमेश कोळी व राधा राम मच्छिमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष नामदेव ठाकूर यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, वहाळ साईबाबा मंदिरचे प्रमुख रविंद्र पाटील, विभागीय अध्यक्ष विजय घरत, निलेश खारकर, संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. गव्हाण जिल्हा परिषद गटातून निकिता निलेश खारकर, वहाळ गणामध्ये वितेश त्रिंबक म्हात्रे तर गव्हाण गणातून जिज्ञासा मनोहर कोळी भाजप महायुतीचे उमेदवार आहेत. या उमेदवारांना नांदाई माता आणि राधा राम मच्छिमार सहकारी संस्थांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.**

**( दैनिक युवक आधार)**

# साईनाथ विद्यालय बोर्ड येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादक :** साईनाथ विद्यालय, बोर्डा, कन्हान, नागपूर येथे स्नेहसंमेलन च्या उदघाटन सोहळयामध्ये मुख्य अंतिथी म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर ज़िल्हा प्रधान सचिव डॉ. सुनिल भगत होते.

या प्रसंगी कन्हान च्या पोलीस उपनिरीक्षक वैजयंती मांडवघरे ह्या अंतिथी होत्या.

संस्थाचे संचालक सुखराम लाछोडे अध्यक्ष स्थानी होते . मुख्याध्यापक विनोद लाछोडे , महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर चे कार्यकारी सदस्य उमेश चिट्टे, शिक्षिका सौ चटप, शिक्षक, पालक व




विध्यार्थी वर्ग प्रामुख्याने उपस्थित होता.

याप्रसंगी डॉ. सुनिल भगत यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विध्यार्थी ह्यावर आपले विचार मांडलेत. पोलीस उपनिरीक्षक वैजयंती मांडवघरे यांनी ह्या स्मार्टफोन च्या युगात कित्येक वेळा होणाऱ्या सायबर गुन्हापासून विध्यार्थी आणि पालक यांनी कसे सावध राहावे ह्यावर भाष्य केले. विध्यार्थी, माजी विध्यार्थी आणि त्यांचा सत्कार करण्यात आला. भाषणानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम विध्यार्थ्यांनी हिरीरीने सहभाग नोंदविला.

स्नेह संमेलन सोहळयासाठी आजबाजूच्या गावातील सरपंच ,. ग्रामसेवक आणि इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# सुरगाणा महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमात उपस्थित कर्मचारी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी सांगितले की भारत देश विविधतेने नटलेला आहे न्याय,समता स्वातंत्र्य, बंधुता आणि मुलभूत अधिकार यांची प्रत्येक व्यक्तीने अंगिकारले पाहिजे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्य चळवळीत लढा देणारे क्रांतिकारक महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, भगतसिंग यांचे स्मरण केले पाहिजे असे आवाहन केले.कार्यक्रमात प्रा. कविता भोये यांना सक्षम सोसायटी दिल्ली यांचा वूमेन इन लिडर शिप आणि डेव्हलपमेंट इंटरनॅशनल एज्युव्हिजन पुरस्कार मिळाला त्याबद्दल सत्कार करण्यात आला.तसेच



कु.कावेरी महाले ( आंतर विद्यापीठ हॅन्डबॉल स्पर्धेत सहभाग)वनराज जाधव ( आंतर विभागीय खो,खो)गौरव सुर्यवंशी (आंतर विभागीय कबड्डी) याशिवाय प्रकाश आहेर व कावेरी धुम यांचा राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. संतोष पवार यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे,डॉ. चंद्रकांत पाटील,प्रा. सुरेश भोये, राजेंद्र शिंदे,प्रा.संजय महाजन, प्रा.बाळू धुम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामपंचायत पापळ येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या थाटामाटामध्ये साजरा

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी/प्रतिनिधी/अनिल ससाने** : जालना ज जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील पापळ येथे ग्रामपंचायत पापळ येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला सकाळी ७.३० वाजता गावचे उपसरपंच अनिल भाऊ ससाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला त्यावेळी उपस्थित ग्रामपंचायत सदस्य श्री कुंडलिक गायकवाड , दामोदर इंगळे , अर्जुन बोबडे , विजय मोरे रोजगार सेवक दिलीप मोरे, ग्रामपंचायत शिपाई इमरान शेख, लक्ष्मण संसाने जिल्हा परिषद शाळा, मुख्याध्यापक जाधव सर, व त्यांचा स्टॉप भास्कररावजी शिंगणे माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बुरकुल सर



व त्यांचा स्टॉप व गावातील प्रतिष्ठित नागरिक विद्यार्थी व आजी माजी सरपंच उपसरपंच आजी-माजी तंटामुक्ती अध्यक्ष आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य आजी-माजी शालेय समिती अध्यक्ष व समिती पोलीस पाटील व सामाजिक संघटना अध्यक्ष उपाध्यक्ष पत्रकार बंधू इत्यादी गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# चाईल्ड प्रायमरी स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**केज प्रतिनिधी :** चाईल्ड प्रायमरी स्कूल येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेच्या पालकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत गायन करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सकाळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी प्रभात फेरी काढून परिसरात देशभक्तीचा संदेश दिला.

या कार्यक्रमास शाळेचे शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लोकमतचे पत्रकार निनाद देशमूख यांची रिसोड तालूक्यात पत्रकारीतेची छाप

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** रिसोड तालूक्यातील मुळचे वाकद येथील रहीवासी असलेले पत्रकारीतेच्या माध्यमातून ते रिसोड येथे स्थायिक झाले. लोकमतचे निर्भिड पत्रकार म्हणून त्यांची ख्याती आहे. निनाद देशमूख हे सधन कास्तकार आहेत. शेती सांभाळून ते पत्रकारीता करतात. पत्रकारतेमध्ये त्यांनी रिसोड शहरासह तालूक्यात मान मिळविला आहे. जनतेचे प्रश्न पेपरमध्ये मांडणे हे त्यांचे ध्येय आहे., त्यामूळे अनेकजण



त्यांना वचकून राहतात. रिसोड शहरातील गणमान्य नेते सूद्धा योग्य तो मानसन्मान देतात. ही त्यांची विशेषतः आहे. लोकमत समूहाने निनाद देशमूख यांचे उत्कृष्ट पत्रकारीतेबद्दल २वेळा मलेशिया येथे मानपत्र मिळाले आहे.

# श्री शिवाजी विद्यालय रिसोड येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड (प्रतिनिधी) रणजितसिंह. ठाकुर :** येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये 26 जानेवारी 2026 रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला, यावेळी अमरावती विभागाचे शिक्षक आमदार तथा श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम चे अध्यक्ष ॲड.किरणराव सरनाईक यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी सुरुवातीला भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले, त्यानंतर ध्वजारोहण, राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायन करण्यात आले, त्यानंतर प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने मंचावरील उपस्थित ॲड.किरणराव सरनाईक, सुधाकरराव देशमुख, माजी प्राचार्य डॉक्टर के बी देशमुख यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोडला नव्याने परवानगी मिळालेल्या एनसीसी बटालियनच्या वतीने पथसंचलन सादर करण्यात आले, आमदार सरनाईक यांच्या प्रवेशावेळी एनसीसी बटालियनचे प्रमुख प्रा.अभिजीत देशमुख यांनी त्यांना सलामी दिली, तर एनसीसी बटालियन ने सादर केलेल्या उत्कृष्ट पथसंचालनाने सर्वांना मंत्रमुग्ध केले, त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार देशभक्तीपर गीतावर आधारित सामूहिक कवायत सादर करण्यात आली. यावेळी शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी आपले मनोगत व्यक्त केले, आपल्या मनोगतातून त्यांनी विद्यार्थ्यांना डॉक्टर



बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कठीण परिस्थितीतही मनुष्य कशाप्रकारे उच्च विद्या प्राप्त करू शकतो यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले, तसेच इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना कठोर मेहनत करून यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख यांनी केले, त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून उपस्थित मान्यवरांसमोर शाळेच्या प्रगतीचा आलेख वाचून दाखविला, विज्ञान प्रदर्शनी मध्ये राज्यस्तरावर शाळेला घेऊन जाणाऱ्या जय गजाननराव देशमुख या विद्यार्थ्याचे व त्याच्या मार्गदर्शक शिक्षिका अर्चना देशमुख व प्रतिमा आकोशे यांचा आमदार सरनाईक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मागील वर्षीच्या दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना गावातील प्रतिष्ठित नागरिक व श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचारी यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या गुणवंत पारितोषिक योजनेअंतर्गत प्राप्त पारितोषिकांचे वितरनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांना मोहित करून टाकले, कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक विजय देशमुख व डिगांबर पाचरणे यांनी केले.

# पनवेल मध्ये सदाबहार गीतांचा देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम मेरे देशप्रेमियो ला उत्स्फूर्त प्रतिसाद!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** २६ जानेवारीच्या पूर्वसंध्येला प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून टी.एम.जी.क्रिएशन पनवेल आयोजित देशभक्तीपर गीतांचा 'मेरे देश प्रेमियो' हा बहारदार कार्यक्रम साजरा झाला.भारतीय चित्रपट सृष्टीच्या सुवर्णकाळाची हिंदी व मराठी चित्रपटातील राष्ट्रभक्तीपर गीते ७ ते ७० वर्षे वयोगटातील गायकांनी सादर केली.

श्रद्धा सुर्वे, विजय सुर्वे,दीपक कदम, प्रदीप गायकवाड, सुखदा ठाकूर, अशोक डिका,सुरेखा भुजबळ, सुनीता भुजबळ,स्वरा भुजबळ, राज गौड,मिलिंद जाधव,कैवल्य पवार,डॉ.विजय मोरे,अर्णव झोडगे,रत्नदीपजी,डॉ.धैर्या भांबरे इत्यादी गायकांनी उपस्थिती नोंदविली. नवीन पनवेल येथील सिनेराज सिनेमा शेजारील मंगेश देशपांडे यांचा एडवेंचर कराओके सिंगिंग म्युझिकल स्टुडिओ श्रोत्यांनी भरला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे संस्थापक एन.डी.खान यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनघा जाधव यांनी नेहमीच्या सफाईने केले.प्रसंगानुरूप दर्जेदार काव्यपंक्ती त्यांनी सादर केल्या. कॅप्टन मनोज भांबरे,



माजी सहाय्यक आयुक्त राज गौड, कवियत्री ऋता भांबरे,झाकीर पालेकर,नाजनिन पालेकर, समाजसेविका ॲड.मेघा धुमाळ, आवाज महामुंबईचा चॅनेल चे संपादक तथा पत्रकार उत्कर्ष समिती रायगड चे अध्यक्ष श्री. मिलिंद खारपाटील,स्नेहा चांदोरकर,वीरेंद्र म्हात्रे,अमित शिंदे,,अब्बास मोहम्मद सुर्वे, शहांनवखान,ज्येष्ठ समाजसेवक मुकादम,संतोष भालेराव,एच. एन.पाटील सर, पूजा मंडेरा,सुनील भुजबळ इत्यादी मान्यवराचा सन्मानचिन्ह प्रदान करुन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास सहभागी झालेल्या सर्व गायकांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खान दांपत्याची कन्यका गुलबक्ष खान श्री.व सौ.ताकमोगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मल्हार गृह संकुल मध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिना निमित्त ध्वजा रोहन

**दैनिक युवक आधार**

**राम ढाकणे उरण प्रतिनिधी :** गेले पाच वर्ष झालं दर वर्षी प्रमाणे याही वर्षी आज दिनांक २६ जानेवारी२०२६ रोजी मल्हार गृह संकुल मध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन ध्वजा रोहन करून, मोठ्या उत्साहात साजरा केला.मल्हार गृह संकुल मधील सर्व जाती धर्माचे नागरिक हे कुठलाही मतभेद न करता , कुठलाही वाद न करता, कसलाही भेद भाव न करता सर्व भाडेकरू व मालक मिळून गेले पाच वर्ष झाले, कुठलाही सण अगदी एक कुटुंब प्रमाणे मोठ्या उत्साहात साजरा करत आहेत. कुठलाही वाद न करता एका कुटुंबासारखे राहत आहेत.

या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर हवालदार श्री शरद महादेव केकाने आणि सार्जेंट श्री रंजन दिगंबर आंबेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली तसेच उपस्थित सभासद आणि कमिटी मेंबर अध्यक्ष रवींद्र मोरे, सेक्रेटरी दिनेश पाटील, खजिनदार किरण सावंत,पैलवान दादाभाऊ नरसाळे किरण घोडके ,स्वप्निल नरनवरे पुरुषोत्तम हवळे ,बाळासाहेब चत्तर, तात्या भिसे, रुपेश धाडवे संतोष डोईफोडे, प्रकाश पाटील, रामनाथ गर्जे, जगदीश ठाकुर प्रेम घोलप, मंगेश भोर, चित्तरंजन प्रसाद, विष्णू जाधव, श्रीधर चौगुले,



अमित घोडके, संदेश झूमरे, सागर खांडेकर, बाबाजी बेलोटे, राम ढाकणे, विकास साळुंखे, वैभव तांबोळी, सुनील यमगर ,आनंद गवई, राहुल रघुनाथन, राजेश पाल, सचिन कसबे बाळासाहेब, पांढरे मायाप्पा गडदे तसेच महिलाही उपस्थित होत्या राधा सुरवडे, विद्या कुरळेकर, भाग्यश्री नरसाळे सुप्रिया सावंत, वंदना घोडके प्रियंका सावंत, विजया डोईफोडे गायत्री गोसावी, अर्चना हळवे अनुजा घोलप, संगीता गर्जे योगिनी केकाने, प्रियंका घोडके प्रतीक्षा नरनवरे, विद्या भिसे शोभा पोखरकर, जया भोर, मंदा इलापते, वर्षा माने, शितल घोडके ,मीरा प्रसाद, भारती कदम, अनिता जाधव, शारदा निकम, लता जाधव , तेजस्वनी सानप आणि मल्हार गृह संकुल मधील तसेच पंचक्रोशीतील मान्यवर उपस्थित होते.

# येरगी येथे नुतन ग्राम सचिवालयाचे लोकार्पण

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** तालुक्यातील चालुक्यकालीन ऐतिहासिक नगरी येरगी येथे प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी ग्रामसचिवालयाच्या नवीन इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.सदरील नूतन इमारतीचे उद्घाटन सरपंच संगीता शंकरप्पा मठवाले यांच्या हस्ते करण्यात आले.उद्घाटन सोहळ्यापूर्वी नवीन ग्रामसचिवालयात ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यानंतर बालविवाह प्रतिबंधाची,मतदान जनजागृतीची,कुष्ठरोग निर्मूलनासाठीची शपथ सर्वांना देण्यात आली.यानंतर कार्यक्रमाच्या सुरुवातीस सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात येऊन नूतन ग्रामसचिवालयाच्या इमारतीची उद्घाटन सरपंच संगीता मठवाले यांच्या हस्ते करण्यात आले.



सदरील ग्रामसचिवालयाच्या नवीन इमारतीत सोलार प्लांट बसवण्यात आले असून ग्रामसचिवालयामध्ये सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,ग्राम विकास अधिकारी,कार्यालय व संगणक हॉल,त्यानंतर ग्रामविकास अधिकारी यांच्यासाठी वेगवेगळी स्वतंत्र कक्ष बांधण्यात आली आहेत. यांच्यासोबतच गावातील विद्यार्थ्यांसाठी आणि नागरिकांसाठी वाचनालय आणि त्यासोबतच अभ्यासिकेचे नियोजन या इमारतीत करण्यात आले असून त्याचे संपूर्ण काम होण्यास अवधी आहे.

संतोष पाटील म्हणाले की गावातील विद्यार्थ्यांना एकत्र शांत बसून अभ्यास करता यावा,लाईट गेल्यानंतर सुद्धा विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी सौर ऊर्जेवर चालणारी वीज सेवा पुरवण्यात येणार आहे.

ग्राम सचिवालयाच्या उद्घाटन प्रसंगी संगीता मठवाले,संतोष पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ बागेवार,विठाबाई अशोक बरसमवार,बालाजी तल्लारवार,अशोक वाघमारे,कोंडाबाई पुंडलिक वाघमारे,सुशीलाबाई सुरेश सोमवार,वर्षा गजानन सूर्यवंशी,बालिका पंचायत राज समितीचे सरपंच अंजली वाघमारे,उपसरपंच पूनम सूर्यवंशी,ग्रामविकास अधिकारी तथा सचिव महादेवी दाणेवार,पोलीस पाटील शिवकांता भुरळे,तंटामुक्ती अध्यक्ष अनिता बागेवार,अश्विनी पांचाळ,मोनिका माळगे,महादेवी कुंचगे,रुक्मिणी भुरळे,रितिका चिटकुलवार,मोनिका माळगे,अंगणवाडी, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद शाळा येथील सर्व कर्मचारी व गावातील सर्व प्रतिष्ठित महिला पुरुष नागरिक,युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गव्हाण-कोपरच्या आरोग्य केंद्रात महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते ध्वजवंदन!

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते गव्हाण-कोपरच्या आरोग्य केंद्रात ध्वजवंदन करण्यात आले. सकाळी ते शेलघर, रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, खारकोपर येथील जिल्हा परिषद शाळा, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल आदी ठिकाणीही ध्वजवंदनासाठी आवर्जून उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. यावेळी ध्वजवंदनासाठी पोलिस अधिकाऱ्यांनी महत्त्वाची



भूमिका निभावली. त्या त्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी, शिक्षकांनी ध्वजवंदन उत्तम तयारी केलेली होती.यावेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर, अरुणशेठ भगत आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्याने उपस्थित होते.

## valley shilp को-ऑपरेटिव्ह सोसायटीत प्रजासत्ताक दिनाचा उत्साह; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई (संतोष वाव्हळ) :** खारघर सेक्टर 36 येथे आज दि. २६ जानेवारी २०२६ – *valley shilp* को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीमध्ये यंदाचा प्रजासत्ताक दिन अत्यंत दिमाखात आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. देशप्रेमाचे प्रतीक असलेल्या या सोहळ्यात सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी आणि सर्व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

**ध्वजारोहण आणि सांस्कृतिक मेजवानी**

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी 8.45 वाजता अत्यंत भव्य अशा ध्वजारोहणाने झाली. तिरंग्याला सलामी दिल्यानंतर राष्ट्रगीत गायले गेले, ज्यामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला. त्यानंतर सोसायटीतील लहान मुलांनी आणि सदस्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये देशभक्तीपर गीते



आणि नृत्यांचा समावेश होता.

सुरक्षेचे धडे: कराटे आणि फायर ड्रिल

केवळ मनोरंजनावर भर न देता, सोसायटीने रहिवाशांच्या सुरक्षेसाठी विशेष उपक्रम राबवले. यामध्ये:

कराटे प्रशिक्षण: स्वसंरक्षण कसे करावे आणि कठीण प्रसंगी स्वतःचा बचाव कसा करावा, याचे प्रत्यक्ष सादरीकरण यावेळी करण्यात आले.

अग्निशमन प्रात्यक्षिक (Fire Drill): अचानक आग लागल्यास ती कशी विझवावी, अग्निशमन उपकरणे कशी वापरावीत, याचे लाइव्ह डेमॉन्स्ट्रेशन (प्रत्यक्षिक) दाखवण्यात आले . यामुळे रहिवाशांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे महत्त्वाचे शिक्षण मिळाले.

**गुणवंतांचा सत्कार**

सोसायटीचे नाव उज्ज्वल करणाऱ्या रत्नांचा सन्मान* हा या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरला. ज्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि राज्य स्तरावर विविध क्षेत्रांत यश संपादन करून सोसायटीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे, अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सोसायटी कमिटीच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

**कमिटीचे कौतुक**

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी आणि कार्यकारी समितीच्या सदस्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे सर्व सभासदांनी विशेष कौतुक केले. शिस्तबद्ध नियोजन आणि वैविध्यपूर्ण उपक्रमांमुळे यावर्षीचा प्रजासत्ताक दिन स्मरणीय ठरला.

कार्यक्रमाची सांगता अल्पोपहाराने आणि उत्साही वातावरणात झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्थ लोकनितीचे संपादक/ खारघर पत्रकार संघाचे संस्थापक सचिव: संतोष वाव्हळ आणि गावडे मॅडम यांनी केले.

## पनवेलमध्ये अर्ज माघारीवेळी हायव्होल्टेज ड्रामा; भाजपवर 'उबाठा' उमेदवार पळवल्याचा आरोप करत शेकाप आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पंचायत समिती निवडणुकीच्या अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी पनवेल तहसील कार्यालय परिसरात आज मोठा राजकीय थरार पाहायला मिळाला. आदई पंचायत समिती गणातील 'उबाठा' गटाच्या उमेदवार अनिता डांगरकर यांचा अर्ज मागे घेण्यावरून शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) आक्रमक झाला. भाजपने हा उमेदवार पळवल्याचा खळबळजनक आरोप करत शेकाप कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयासमोर जोरदार राडा केला. अखेर पोलिसांच्या मध्यस्थीनंतर या प्रकरणावर पडदा पडला.

**नेमका वाद काय?**

आदई पंचायत समिती मतदारसंघात महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार म्हणून शेकापचे विलास फडके रिंगणात आहेत. मात्र, याच मतदारसंघातून उबाठा (ठाकरे गट)



उमेदवार अनिता डांगरकर यांनीही अर्ज भरला होता. आघाडीचा धर्म पाळण्यासाठी डांगरकर यांनी अर्ज मागे घ्यावा, अशी शेकापची भूमिका होती. मात्र, आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी डांगरकर या भाजपच्या संपर्कात असून भाजपनेच त्यांना अर्ज मागे घेण्यापासून रोखण्यासाठी 'पळवून' नेले आहे, असा संशय शेकापला होता.

**तहसील कार्यालयाबाहेर राडा**

डांगरकर या अर्ज मागे घेण्यासाठी वेळेत पोहोचू नयेत यासाठी पडद्यामागून हालचाली होत असल्याचा आरोप करत शेकापचे उमेदवार विलास फडके आणि महिला आघाडीच्या तेजस्विनी घरत यांनी कार्यकर्त्यांसह तहसील कार्यालयाबाहेर ठिय्या मांडला. यावेळी एक गाडी अडवण्यात आली आणि कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केल्याने परिसरात तणाव निर्माण झाला. भाजपचे कार्यकर्ते प्रत्यक्ष समोर नसले तरी, त्यांच्या छुप्या पाठिंब्यामुळेच हा गोंधळ होत असल्याचा दावा शेकापने केला.

**पोलिसांची मध्यस्थी आणि माघार**

परिस्थिती चिघळत असल्याचे पाहून वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी तातडीने धावपळ करत कार्यकर्त्यांना शांत केले . त्यानंतर पोलीस निरीक्षकांच्या दालनात शेकाप नेते आणि संबंधित उमेदवाराची बैठक झाली. बराच वेळ चाललेल्या या चर्चेनंतर आणि कायदेशीर प्रक्रियेनंतर अखेर अनिता डांगरकर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला.

## कोठुरे येथे प्रधानमंत्री आवास योजनेचा भव्य गृहप्रवेश सोहळा उत्साहात संपन्न

### १२९ घरकुलांपैकी ८७ पूर्ण; लाभार्थ्यांचा सन्मान, वाचनालयाचे उद्घाटनही संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : ग्रामपंचायत कोठुरे, तालुका निफाड येथे प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत सन २०२४–२५ मधील मंजूर घरकुल लाभार्थ्यांचा गृहप्रवेश सोहळा आज दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मोठ्या उत्साहात पार पडला.

हा सोहळा आमदार दिलीपराव शंकरराव बनकर यांच्या शुभहस्ते व राजेंद्र सदाशिव डोखळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून गटविकास अधिकारी श्रीमती नम्रता जगताप व मा. सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील उपस्थित होते.

कोठुरे येथे एकूण १२९ घरकुले मंजूर



असून त्यापैकी ८७ घरकुले पूर्ण झाली आहेत, तर उर्वरित घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. कार्यक्रमप्रसंगी आमदार दिलीप काका बनकर यांच्या हस्ते लाभार्थ्यांचा विधिवत गृहप्रवेश करून त्यांना घराची चावी व घरबांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

याच कार्यक्रमात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या प्रेरणेतून साकार झालेल्या "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले वाचनालयाचे" उद्घाटन देखील करण्यात आले, ज्यामुळे गावातील शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरणाला नवी दिशा मिळणार आहे.

कार्यक्रमास विस्तार अधिकारी (ग्रा.प.) संजय पवार, राजेश थोरात, बोरसे, कनिष्ठ अभियंता श्रीमती ललवाणी, सरपंच सरला उत्तम बुटे, उपसरपंच ज्योती बाळू पवार, जयश्री मोगल, नवनाथ मोगल, मच्छिंद्र कोकाटे, बाळू बेंडकुळे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती आरती दिघे, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत कोठुरेच्या वतीने विशेष परिश्रम घेण्यात आले असून, या सोहळयामुळे लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान स्पष्टपणे दिसून येत होते.

# भारज बुद्रुक येथे ठीक ठिकाणी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी/ ज्ञानेश्वर निकाळजे** :' जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथे ठीक ठिकाणी ७७ व्या प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी शालेय शिक्षण व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री शरद तेलंग्रे , यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

ग्रामपंचायत कार्यालय भारज बुद्रुक येथे ध्वजारोहण (सरपंच ) सौ शकुंतलाबाई रामचंद्र तेलंग्रेयांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच श्री शिवाजी विद्यालय भारज बुद्रुक येथे ध्वजारोहण ( मुख्याध्यापक ) लुटे सर यांच्या हस्ते करण्यात आले पशु वैद्यकीय दवाखाना









भारज बुद्रुक येथे ध्वजारोहण तंटामुक्ती अध्यक्ष विलास गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले विविध कार्यकारी सहकारी सोसायटी येथे ध्वजारोहण श्री सुधाकर कोथलकर यांच्या हस्ते करण्यात आले

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथे ध्वजारोहण श्री संजय तेलंग्रे (पोलिस पाटील ) यांच्या हस्ते करण्यात आले यावेळीगुरुकुल वरिष्ठ महाविद्यालय भारज बुद्रुक येथे ध्वजारोहण देविदास बेराड यांच्या हस्ते करण्यात आले ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व परेडच्या माध्यमातून देशभक्तीचा जागर करण्यात आला. यावेळी विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य व लेझीम पथक, डॅबेज पथक, घुंगर काठी आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.

कार्यक्रमा दरम्यान जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आणि श्री शिवाजी विद्यालय भारज बुद्रुक ह्या दोन्ही शाळेच्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी स्कूल बॅग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी, शासकीय प्रशासकीय अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी, पत्रकार ,विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रजासत्ताक दिनाच्या या पावन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी देशाच्या एकता, अखंडता आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण करण्याचा संकल्प व्यक्त केला.